MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष अठरावे / अंक १२ / डिसेंबर २०१७

## संपादकीय

### लिओनॉर्दो आणि त्याच्या कलाकृती



**सॅलवॅटॉर मुंडी** (Salvator Mundi)

१५ नोव्हेंबर २०१७ ला कलाकृतींचा लिलाव करणाऱ्या ख्रिस्ती (Christie) या उद्योगसमूहांने न्यू यॉर्कला एक विक्रम प्रस्थापित केला. लिओनार्डो दा विंची (Leonardo da Vinci) यांची सॅलवॅटॉर मुंडी (Salvator Mundi) ही कलाकृती ४० कोटीला लिलावात विकली गेली. अजूनपर्यंतच्या इतिहासामध्ये कलावस्तूंना मिळणाऱ्या किंमतीमध्ये ही सर्वात जास्त किंमत आहे. साहजिकच या विक्रीची नोंद न्यू यॉर्क टाइम्सपासून, फायनानशिअल टाइम्सपर्यंत सगळ्या वृत्तपत्रांनी नुसती बातमीच नाही, तर विशेष लेख लिहून घेतली. या किंमतीवर बरेच कलाचिकित्सक नाराज आहेत, कारण कलाकृतींच्या 'खऱ्या' मूल्यांवर त्याचा विपरित परिणाम होईल अशी त्यांना भीती आहे.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

पाश्चिमात्य देशांमध्ये कलाकृतींना एक विशेष महत्त्व आहे. मानवी सृजनाचं ते एक अंग म्हणून बघितलं जातं. आधुनिक विज्ञानाचा जेवढा अभ्यास होतो त्याच विश्लेषणात्मक दृष्टींनी कलाकृतींचाही अभ्यास होतो. कलेबरोबरच कला इतिहास, कला चिकित्सा, आणि कलेच्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' अंगांचाही ऊहापोह होतो. यामुळेच त्यांची संग्रहालयं आणि ग्रंथालयं ही या विषयांवरील कलाकृती आणि पुस्तकांनी खच्चून भरलेली असतात. या विषयाला वाहिलेली अनेक पाक्षिकं, मासिकं आणि नियतकालिकं तेथून प्रकाशित केली जातात.

याचं दुसरं एक वैशिष्ट्य म्हणजे, कुठल्याही व्यक्तीला अशा कलाकृती बाळगता तर येतातच, पण त्या विकताही येतात. असं समजलं जातं की, जेवढ्या कलाकृती संग्रहालयामध्ये प्रदर्शित आहेत त्याहून कितीतरी जास्त त्या वैयक्तिक संग्रहांमधून आहेत. कलेला मिळणाऱ्या या 'सांस्कृतिक' आणि 'सामाजिक' महत्त्वामुळे त्याची देखभाल आणि नोंदणीही काळजीपूर्वक केली जाते.

लिओनार्दोच्या या चित्राला मिळालेली ही विक्रमी किंमत म्हणूनच त्याच्या 'अर्थ'कारणाच्या पलीकडे जाऊन बघावी लागते. अशाप्रकारच्या कलाकृती हे गर्भश्रीमंत लोक जसे विकत घेत असतात, तसेच अनेक उद्योगसमूह आणि संग्रहालयेही अशा वस्तू विकत घेतात. कुठल्या कलाकारांनी या वस्तू निर्माण केल्या आहेत याप्रमाणेच त्यातील कलाविष्कार आणि तत्कालीन सामाजिक आशय यालाही महत्त्व दिले जाते. लिलावांमधून या वस्तू जेव्हा एवढी मोठी किंमत देऊन विकत घेतल्या जातात तेव्हा ती वस्तू विकत घेणाऱ्या व्यक्ती किंवा समूहाचं नाव सहसा जाहीर केलं जात नाही. या चित्राच्या लिलावानंतरही हे चित्र कोणी विकत घेतले असेल या संदर्भात उलटसुलट चर्चा चालू झाल्या. वॉल स्ट्रिट जर्नल आणि इतर समाज माध्यमांमधून लवकरच ते नाव जाहीर झाले आणि सगळ्यांनाच आणखीन एक मोठा धक्का बसला. सौदिच्या राजानी आपल्या सांस्कृतिक आणि पर्यटन विभागाकरिता ती कलाकृती विकत घेतल्याचे जाहीर केले. एवढेच नाही तर ती कलाकृती आबुधाबी येथे फ्रान्सच्या लूर (Louvre) संग्रहालयाच्या मदतीने नुकत्याच उघडलेल्या संग्रहालयात कायम स्वरूपात ठेवण्यात येणार आहे असेही त्यांनी जाहीर केले.

श्रीमंत अरबदेशांची अजूनपर्यंतची प्रतिमा ही ईस्लामिक कट्टरवाद्यांना मदत करणारी यंत्रणा अशी होती. शिवाय कला किंवा मूर्तींकडे बघण्याचा इस्लामचा दृष्टीकोनही मूर्तीभंजक असाच होता. हे चित्र तर चक्क ख्रिस्तीधर्माचा संस्थापक येशूख्रिस्त याचे आहे. अरब जगतामध्ये होऊ घातलेल्या एका मोठ्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' क्रांतीची ही नांदीच म्हणायला लागेल.

या चित्राला मिळालेल्या या प्रचंड किंमतीमागे अर्थातच या चित्राचा विषय, आणि त्याचा निर्माता लिओनार्दो हे दोघेही तेवढेच जबाबदार आहेत. तसेच या चित्राचा गेल्या ५०० वर्षांतील प्रवासही मोठा रंजक आहे.

'सॅलवॅतॉर मुंडी' हे चित्र लिओनार्दोनी इ. स. १५०० च्या आतबाहेर काढले आहे. ते सध्या विकले जाण्याच्या आधीचा त्याचा मालक रशियन अब्जाधीश Dmitry Rybolovlev हा होता. 'ख्रिस्ति'नी हे चित्र विकायच्या आधी त्याला बरीच प्रसिद्धी देऊन जगभर त्याची प्रदर्शने भरवली.

(पृष्ठ क्र. ३८ वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष अठरावे/अंक १२/डिसेंबर २०१७**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | रानफुले | सौ. अल्पना अशोक बापट | ३ |
| ३) | शास्त्रवेध-०६ विश्वकिरणे आणि मूलकीकरणे | श्री. नरेंद्र गोळे | ९ |
| ४) | वनदेवतेस पत्र | श्री. अरविन्द दोडे | १४ |
| ५) | जपानी विद्यार्थ्यांचे भारतीय हायकू | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | १७ |
| ६) | आजचे शिक्षण : ज्ञान देणारे की मार्कस् कमावणारे? | गौरी अंबाजी परब | २३ |
| ७) | गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २५ |
| ८) | 'मानवी पुनरुत्थानवाद' | श्री. नरेंद्र गोळे | ३२ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# रानफुले

*रानफुलांविषयी माहिती या लेखात विशद केली आहे. - संपादक*

कर्जतच्या वाटेवर वर्षानुवर्षे मी निसर्गाची वेगवेगळी रूपे न्याहळते आहे. या वाटेवर निसर्गातला देवच जणू मला भेटतो. ग्रीष्मात सर्व चराचर सृष्टी रुक्ष, उजाड, तहानलेली असते. कोणीतरी म्हटले आहे,

दाहकतेच्या ओलाव्याने तप्त दुपारी ऊन बरसते,
पण अशा वेळीही -
'गुलमोहोराचे झाड गुलाबी,
मोहरलेला सफेद चाफा,
चाफ्याने गंधाळून गेल्या
उष्ण उन्हाच्या कोवळ्या वाफा.'

आणि मग आषाढात पहिला पाऊस येतो. पहिल्या पावसाने सृष्टीचे रूपच पालटते. सृष्टीला नवसंजीवन मिळते. जादूची कांडी फिरावी तसे असंख्य जीव, जंतू, कीटक, हिरवाई दिसू लागते, बहरते.

बा.सी. मर्ढेकर म्हणतात...

आला आषाढ श्रावण,
आल्या पावसाच्या धारा,
किती चातक चोचीने,
प्यावा वर्षाऋतू तरी.

नदी, नाले, ओढे आदी वाहू लागतात. जनावरे, पशू, पक्षी तृप्त होतात. आणि श्रावणाचे वर्णन तर अनेक कवींनी अनेक प्रकारे केले आहे. निसर्ग हिरवा रंग परिधान करतो. कुसुमाग्रज म्हणतात....

हसरा नाचरा, जरासा लाजरा,
सुंदर साजरा, श्रावण आला,
लपत छपत, हिरव्या रानांत,
केशर शिंपित, श्रावण आला.

भाद्रपदात गणपतीतही भरपूर पाऊस बरसला आहे. पण यानंतर पावसाने थोडी विश्रांती घेतली. हळदीचे ऊन पडले आहे. बाहेर डोंगर माथ्यावर, डोंगराच्या पायथ्याशी, रानावनात, माळावर हिरवेकंच गवत वाढले आहे. सगळीकडे हिरवे गार गालिचे पसरले आहेत.आणि आता या हिरव्या रंगावर निसर्गाने सुंदर नक्षी काढायला सुरवात केली आहे.निरनिराळ्या रंगांची उधळण चालू झाली आहे.

लाल, पिवळी, पांढरी, गुलाबी, जांभळ्या अशा नाना रंगांची व आकाराची रानफुले फुलू लागली आहेत. त्यातली काही तर अगदी नखांएवढी, पण सौंदर्यात, नजाकतेत कुठेही कमी पडत नव्हती.

**नीळवंती : Cyanotis Fasciculata**





ही अतिशय छोटी जांभळी गवतफुलं. त्यावर पिवळ्या रंगाचे परागकण असतात. ही फुलं ४ मिमी. ते ६ मिमी. पेक्षा जास्त मोठी नसतात. या निळवंतीला पाहूनच कवयित्री इंदिरा संत म्हणत तर नसतील ना...

रंग रंगुल्या संसानुल्या गवतफुला रे गवत फुला, असा कसा रे सांग लागला,

सांग तुझा रे तुझा लळा, हिरवी नाजूक रेशीम पाती, दोन बाजूला सळसळती,

नीळ निळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती

**रानभेंडी : Thespesia Lampas COMMON MALLOW**





पिवळे जर्द क्रेपच्या कागदासारखे नाजूक पाकळ्या असलेले मोठे गेंडेदार रानभेंडीचे फुल. याचे झुडूप ३ ते ४ फुटापर्यंत वाढते. एखाद्या नववधूसारखे पिवळे वस्त्र परिधान केलेली ही फुले नम्रपणे खाली मान घालून वाऱ्यावर डोलत असतात. या फुलाचा आतला भाग गडद जांभळ्या किंवा किरमिजी रंगाचा असतो. त्यात नारिंगी रंगाचा पुंकेसरचा दांडा असतो

**कळलावी : (अग्निशीखा) Gloriosa Superba, Glory Lily**



ऑगस्ट–सप्टेंबर मध्ये उंच गवतात ही फुले तुरळकपणे दिसतात. फुलं इतकी सुंदर असतात की फुलावरून नजर ढळत नाही. अर्ध्या पाकळ्या लाल रंगाच्या तर खाली जर्द पिवळा रंग. फुल रंग बदलते व नंतर पूर्ण लाल होते. ६ पाकळ्यांचे हे फुल वेलीवर आधी पाकळ्या हिरव्या नंतर पिवळ्या, नारिंगी लाल होत जातात. याच्या पुंकेसराचे दांडे तलवारीप्रमाणे पसरलेले दिसतात. ही वेल नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. कारण त्याचा प्रत्येक भाग औषधी असल्याने अख्खी वेलच उपटली जाते, परत ती लावली जात नाही. नुकत्याच झालेल्या हरतालिका, गणपती आणि गौरीच्या पूजेसाठी म्हणून यांचा उपयोग करण्यात आल्याचे पाहिले. त्यासाठी त्यांची वारेमाप तोड करण्यात आली होती. त्या दिवसाचं महत्त्व संपल्यावर दुसऱ्या दिवशी त्यांना केराची टोपली दिसली. केराच्या टोपलीतल्या त्या केविलवाण्या वेली पाहवत नव्हत्या. याला 'कळलावी' म्हणतात. कारण यांच्या कंदांचा रस पोटात गेल्यावर गरोदर स्त्रीला लवकर कळा येण्यास मदत होते.

**पेव / कोष्ट : Costus Speciosus CRAPE GINGER or SPIRAL GINGER**





हे झुडूप ३ ते ४ मीटरपर्यंत वाढते. पाने हिरवीगार मोठी असतात. त्यावर पांढऱ्या क्रेप कागदासारखी फुले येतात. जंगलात दलदलीच्या जागी थोड्याशा सावलीत पेव वाढते. फुलाचा खालचा भाग चॉकलेटी लाल असतो.फुले खूप नाजूक दिसतात. आपल्याकडे 'पेव फुटणे' हा वाक्प्रचार आहे. तो कदाचित याच फुलावरून घेतला असावा. कारण याची वाढ खूप वेगाने होते.

निसर्ग व मानव याचे अतूट, अतिशय जवळचे नाते आहे. पण शहरी वेगवान जगामुळे आपणास निसर्गाकडे बघायलाही वेळ मिळत नाही. ही सर्व रानफुले म्हणजे जैवविविधतेचेच उदाहरण आहे. असंख्य

फुलपाखरे कीटक, पक्षी, यांवर बसतात. ही फुले सुंदर तर आहेतच, तसेच त्यांच्यात अनेक औषधी गुणधर्मही आहेत. पावसाळ्याअखेर ही फुले कमी व्हायला लागतात. त्यांची मुळे, कंद जमिनीतच राहतात आणि पुढच्या वर्षी परत त्याच ठराविक काळत फुलतात. आपले सर्व सणवार, उत्सव, खाणे, पिणे, म्हणी, वाक्प्रचार (तेरड्याचा रंग तीन दिवस) या निसर्गाशी जोडलेल्या आहेत.

श्रावणात सणांची रेलचेल असते. अशा वेळी काही खास सणांना पत्री, फुले पूजेसाठी म्हणून वापरली जातात. त्यापैकीच एक मंगळागौर. खरं तर या पत्री गोळा करण्यामागे उद्देश निसर्गाच्या सान्निध्याचा लाभ मिळावा असा असेल का? हरितालिकेसाठी, गणपतीसाठी, गौरींसाठी भरपूर पत्री पूजेसाठी लागते. ही पत्री सुद्धा ठरावीकच असते जसे की बेल, आघाडा, दूर्वा, जास्वंद, जाई, जुई, अशी त्यानुसार त्यांची फक्त ५-५ चं पाने तोडायची असतात. हल्ली 'वेळ नाही' या सबबीखाली बाजारातून कोणतीही पाने तोडून आणलेली असतात. तीही चक्क ओरबाडून आणलेली असतात. प्रमाणाबाहेर तोडून नाशाला आपणच कारणीभूत ठरत चाललो आहोत. सर्व फक्त दिखावूपणे साजरे करण्याकडे कल वाढत चालला आहे. त्यातले संस्कार, त्यातील भाव कमी होत चालला आहे. ऋषी पंचमीला मुद्दाम परसात उपलब्ध असणाऱ्या भाज्या (रानभाज्या) केल्या जातात.

निसर्गातील विविधता आपल्याला थक्क, अवाक करणारी आहे. पक्षी, कीटक स्थलांतर करू शकतात. आपला आवडता जोडीदार निवडू शकतात. तर वनस्पती जरी स्थलांतर करू शकत नसल्या तरी पक्षी, कीटक त्यांच्या वाढीसाठी मदत करतात. कीटक फुलावर बसतात तेव्हा त्यांच्या पायांना नाजूक पुंकेसरातील परागकण चिकटतात आणि हेच कीटक दुसऱ्या फुलावर बसले की तिथल्या फुलातील स्त्रीकेसराशी त्यांचे परागीभवन होऊन फलधारणा होते. वनस्पतीचे अनेक गंध, रंग, आकार, कीटकांना आकर्षित करतात. काही वनस्पती या कीटकभक्षक ही असतात. त्या कीटकांना आपल्या जाळ्यात ओढतात. तर काही कीटक भक्षक नसूनही त्यांना पकडून ठेवतात. फलधारणा झाली की त्यांना सोडूनही देतात. या वनस्पती Ceropegia म्हणून प्रसिद्ध आहेत. यांचे २०० प्रकार आहेत.

**कंदील पुष्प/ खर्चुडी : Ceropegia**



**Ceropegia Vincefolia   Ceropegia Hirsuta**

या फुलांचा आकार ट्यूब प्रमाणे असतो. त्याला ५ पाकळ्या असतात. फुलाच्या शेंड्याशी त्या एकत्र आल्याने त्याला गोलाकार प्राप्त होतो. या फुलांना आतून बारीक केस असतात. फुलांच्या वासाने कीटक आकर्षित होतात आणि केसांना चिकटतात आणि आत अडकून बसतात. परागीभवन आणि फलधारणेची क्रिया पूर्ण होईपर्यंत तिथेच राहातात. त्यानंतर त्यांची फुलातून मुक्तता होते. ही फुले कीटक-भक्षक नाहीत.

गेल्या महिन्यात अंजनेरी आणि बोरघाटाच्या जंगलात गेले होते. तिथे ही दोन प्रकारची ceropegia ची फुले पहिली. ही फुले १ते २ इंच उंच असतात. कुठेतरी झुडुपात लपलेली असतात. तेथील ग्रामस्थांनी आम्हाला ती दाखवली. Ceropegia Vincefolia आणि Ceropegia Hirsuta या दोन जाती आम्ही बोरघाटाच्या जंगलात पाहिल्या.

---

जो तारकांना स्पर्श करू पाहतो, तो पुष्कळदा वाटेत गवताची काडी आली तरी अडखळतो! - स्पेन्सर

विश्वरूप रहा व त्यांचे सहकारी गेले कित्येक वर्षं इथे काम करत आहेत. त्यांनी तिथे जवळ जवळ १ लाख झाडे लावली आहेत. रोज या जंगलात त्यांची फेरी असते. त्यांचे अनेक विद्यार्थी व तिथल्या स्थानिक लोकांच्या सहकार्यातून हे काम केले जाते. त्यांच्या कामाला सुरवात झाल्यापासून तिथे चोऱ्यामाऱ्या, आगी लागणे थांबले आहे. अनेक झाडे खूप छान वाढली आहेत. आम्ही जंगलात अनेक वृक्ष तसेच रानफुलेही पाहिली.

आदल्या दिवशी आम्ही अंजनेरी या हनुमानाच्या जन्मस्थानाला भेट दिली. जायचा रस्ता अतिशय अवघड आहे. जुई पेठे व इतर अनेक स्थानिक मुले इथे काम करतात. इथे वाटेवर अनेक रानफुले बघायला मिळाली.

**एकदांडी : Tridex Procumbens**



हे daisy फॅमिलीतले फुल आहे. याला coat-button असेही म्हणतात. या फुलात daisy च्या फुलासारखा मध्ये पिवळा रंग असतो. पाकळ्या पांढऱ्या किवा फिकट पिवळ्या असतात. प्रत्येक पाकळीला तीन ठिकाणी (लोबस्) असतात.

**वंदी /छोटा कल्प – Trichodesma indicum**



Borageinaceae फॅमिली. हे झुडूप सरळ वाढते.फुलाची टयूब फिक्कट जांभळया रंगाची असते. फुलाचे सेपल्स(उपपर्ण) हिरव्या रंगाचे असतात.फुलाच्या मध्यभागी एक टोकेरी दांडा असतो. पाने लांब असतात. ह्याचे बरेच औषधी उपयोग आहेत. हे चवीला झणझणीत आणि कडू असते. त्वचा नरम होण्यासाठी तसेच वेदनाशामक औषध म्हणूनही याचा उपयोग होतो

**चौली /सौरी – Alysicarpus Vaginalis**



Fabaceae फॅमिली मधील हे फुल-फुले ६-१२ च्या गुछ्यात, फुले लाल, जांभळ्या रंगात. फुलाचे दांडे सरळ किंवा जमिनीला लागून पसरतात. गुरांसाठी चारा म्हणूनही शेतात वाढवले जाते. जुलै ते डिसेंबर दरम्यान फुलांचा हंगाम असतो.

**भारंगी – Clerodendrum serratum**



हे झुडूप असून १ ते ४ मीटर उंच असते. हे सर्दी, खोकला व श्वसनाच्या आजारासाठी आयुर्वेदीक औषधांमध्ये वापरतात. मुळांचा उपयोग अस्थमाच्या आजारावर वापरले जाते.

**केना/ कोसापुष्प – Commelina-Family**



**विंचू : - Martynia Annua- Family-Martyniaceae - devil's'claw**




हे झुडूप २ मीटर उंचीचे असते.याच्या फांद्या केसाळ असतात, घंटेच्या आकाराची फुले जांभळी, पांढरी, गुलाबी रंगात असतात. पाकळीवर एक मोठा जांभळा ठिपका असतो.पाने मोठ्या आकाराची असतात.

**कवला – Smithia Hirsuta Family Fabaceae (Legume family)**

पावसाळ्याच्या शेवटी शेवटी कवळाची फुले रस्त्यावर, माळरानावर दिसू लागतात.



पिवळ्या रंगाच्या ३ पाकळ्या असतात. दोन लाल ठिपके असतात.

**Sensitive Smithia - लाजाळू कवला**



**कपार मुसळी – Chlorophytum glaucoides**




हे फुल अंजनेरीला चढताना एका कपारीत दिसलं. फुले पांढरी असून पिवळे पुंकेसर असतात. हा दुर्मिळ वेल आहे.

मंगळवारी सकाळी अंबरनाथ जवळ असलेल्या कोकाळे गावाच्या तलावाजवळ रानफुले बघायला गेलो होतो. आमच्या बरोबर विज्ञान परिषदेचे लोकही होते. परिसर शांत होता.अनेक रानफुले फुलली होती. रानतीळाची गुलाबी फुलं खूप सुंदर दिसत होती. त्याच्या गडद लांब पाकळीच्या बाजूने मधमाशी आत-बाहेर करत होती.

**पांढरे तीळ : Sesamum indicum**






एका फुलातून फुलपाखरू बाहेर आलेलं. अनेक चतुर (dragonflies) घिरट्या घालत होते. सगळीकडे सब्जा फुलला होता.

आपले विचार लपवता यावेत म्हणून मानवाला भाषा दिलेली आहे! – टॅलीरँड



ashy

आम्हांला पिवळी गोधाडी, लाल गोधाडीची फुले दिसली.





**सदा घंटी Ipomoea barlerioides Convolvulaceae (Morning Glory family)**

Ipomoea ही अनेक वेगवेगळ्या जाती असलेली सर्वात मोठी फॅमिली आहे.



**तेरडा Impatiens Balsam**

ही एक वेल आहे.

तेरडा अनेक रंगात येतो, लाल, गुलाबी, जांभळा, पांढरा. श्रावणात, भाद्रपदात असंख्य फुले फुलतात .

पुढच्या आठवड्यात कास पठारला भेट द्यायचा विचार आहे. निसर्गाचे हे चक्र चालूच राहणार आहे. वर्षामागूनवर्षे जातील, ऋतू मागून ऋतू.... पुढच्या वर्षी परत जोमाने रानफुले फुलतील व आपल्याला आनंद देऊन जातील.

**– सौ. अल्पना अशोक बापट**

●●●

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

विचार न करता बडबडणे म्हणजे नेम न धरता गोळी मारण्यासारखे आहे! – डब्ल्यू. जी. बेनहॅम

# शास्त्रवेध-०६ विश्वकिरणे आणि मूलकीकरण

*विश्वकिरणे आणि मूलकीकरण याविषयी माहिती या लेखात विशद केली आहे. - संपादक*

कोणत्याही पदार्थातून उत्स्फूर्तपणे निघणाऱ्या ऊर्जेला किंवा कणांना उत्सर्जन म्हणतात. किरणोत्सारी पदार्थांमुळे होणारे उत्सर्जन प्रामुख्याने ३ प्रकारचे असते. अल्फा, बीटा आणि गॅमा. ह्या उत्सर्जनास ‘अणुकेंद्रकीय उत्सर्जन’ म्हणतात. कारण ते अणूंच्या गर्भातून उगम पावत असते. अल्फा कण म्हणजे हेलियमचे अणुकेंद्रक (न्युक्लिअस) असते, तर बीटा कण म्हणजे ऋणक किंवा वीजक (इलेक्ट्रॉन) असतात. काही जड अणू विद्युतभाररहित कण उत्सर्जित करतात, ते म्हणजे विरक्तक (न्युट्रॉन्स) असतात.


**अल्फा कण:** अस्थिर अणुकेंद्रक, अल्फा व बीटा किरणांचे उत्सर्जन करते व स्वत: सुद्धा ऱ्हास पावत राहते. ह्या प्रक्रियेत निघणारी ऊर्जा ही उष्णतेच्या स्वरूपात असते. उदाहरणार्थ $^{२३८}U_{९२}$ चा ऱ्हास होऊन त्याचे $^{२३४}Th_{९०}$ मध्ये परिवर्तन होते आणि या प्रक्रियेत एक अल्फा कण उत्सर्जित होतो, जो हेलियमचे अणुकेंद्रक असतो.


$^{२३८}U_{९२} = {}^{२३४}Th_{९०} + {}^{४}He_{२}$ (U-युरेनियम, Th-थोरियम, He-हेलियम)

**बीटा कण:** बीटा ऱ्हास प्रक्रियेत अणुकेंद्रकामधील विरक्तक स्वत: विभाजित होतो व त्यातून एक धनक व एक वीजक तयार होतात. त्यामुळे अणूचे वस्तुमान बदलत नाही; पण त्याच्या अणुक्रमांकात एकने वाढ होते. ह्यावेळी वस्तुमानामध्ये थोडा ऱ्हास होतो, जो उष्णतेच्या रूपात बाहेर पडतो.

$^{२३४}Th_{९०} = {}^{२३४}Pa_{९१}$ + बीटा कण (Th-थोरियम, Pa-पॅलाडियम)


**गॅमा कण:** सामान्यत: अल्फा अथवा बीटा कणांच्या उत्सर्जनानंतर अणुकेंद्रकातील अतिरिक्त ऊर्जा, गॅमा किरणांच्या स्वरूपात उत्सर्जित होते.








B ह्या चुंबकीय क्षेत्रातील अल्फा, बीटा आणि गॅमा किरणांची, मेरी क्युरी यांनी केलेली अभिव्यक्ती सोबतच्या चित्रात दर्शवलेली आहे. इथे असे गृहित धरले आहे की किरणोत्सारी पदार्थ एका शिशाच्या ठोकळ्यातील अरुंद पण खोल पोकळीत ठेवलेले आहेत, जेणेकरून विद्युत वा चुंबकीय क्षेत्रांच्या अभावात ही किरणे बारीक उभ्या शलाकेच्या स्वरूपात वर येतील.

कागदास लंब दिशेने सशक्त चुंबकीय क्षेत्र कागदाबाहेर येईल अशा दिशेने लावले असता, अल्फा कण धनभारित आणि तुलनेने जड असल्याने, जरासे उजव्या बाजूस वळतील, बीटा कण ऋणभारित आणि हलके असल्याने डाव्या दिशेने जास्त प्रमाणात वळतील, तर गॅमा किरणे विद्युतभारित नसल्याने सरळच जातील. इथे v हा कणाचा वेग आणि m हे त्याचे वस्तुमान असल्याचे गृहित धरलेले आहे.



विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रांद्वारे वळवलेल्या विद्युतभारित कणांचा अभ्यास करण्याची जे.जे. थॉमसन यांची पद्धत सोबतच्या चित्रात दर्शवलेली आहे. निर्वात पोकळी धारण करणाऱ्या काचेच्या नलिकेत ऋणाग्र C आणि धनाग्र A यादरम्यान विद्युतविभव लावले असता, ऋणाग्रातून निर्माण होणारे वीजक धनाग्रातील S ह्या फटीतून त्यांच्या गतीमुळेच बाहेर पडतात. मग त्यांचेवर चुंबकीय M, तसेच विद्युत PP क्षेत्रे योजून त्यांना वळवले जाई. अशाप्रकारे त्या किरणांचे विद्युत भार, त्यांची गती, त्यांची ऊर्जा इत्यादींबाबत अभ्यास करता येई. मात्र विद्युत क्षेत्र जर त्यांच्या गतीस लंब न राखता त्यांचे गतीच्याच दिशेने लावले तर त्यांना रोखता अथवा त्वरित करता येई.




विद्युतभारित कणांचे अशाप्रकारे त्वरण केल्यास त्यांची गती वाढते. गती ज्यावेळी प्रकाशाच्या गतीच्या तुल्यबल होते तेव्हा त्या कणांचे सापेक्ष वस्तुमान, स्थिर वस्तुमानाच्या तुलनेत कसे वाढत जाते ते सोबतच्या आकृतीत दर्शवले आहे. $m^0$, m, v व c म्हणजे अनुक्रमे स्थिर वस्तुमान, सापेक्ष वस्तुमान, प्रत्यक्षातील गती आणि प्रकाशाची गती हे चल आहेत.

### क्ष–किरणे आणि गॅमा किरणे यांचे गुणधर्म

१. ती मानवी संवेदनांना कळत नाहीत (म्हणजे दिसत नाहीत, ऐकू येत नाहीत किंवा जाणवतही नाहीत).

२. ती सरळ रेषेत प्रकाशाच्या गतीने प्रवास करतात.

३. त्यांचे पथ, विद्युत अथवा चुंबकीय क्षेत्रांनी बदलवता येत नाहीत.

४. दोन पदार्थांच्या जोडावर ती काहीशी वाकतात (रिफ्रॅक्ट).

५. आण्विक कणाशी गाठ पडेपर्यंत, ती पदार्थात पार होत राहतात.

६. दरम्यान ती विखुरली जातात आणि शोषली जातात.


७. ती पदार्थात किती अंतर चालून जाऊ शकतील हे त्यांच्या ऊर्जेवर आणि ज्यातून ते प्रवास करत असतात त्या पदार्थावर अवलंबून असते.

८. पदार्थाचे मूलकीकरण करण्यास पुरेशी ऊर्जा त्यांचेजवळ असते आणि जिवंत पेशींना ते हानी पोहोचवू शकतात किंवा त्यांचा संपूर्ण विनाशही घडवून आणू शकतात.

### अर्धायू

अर्धायुष्याचे तत्त्व विषद करणारा किरणोत्सारी विघटनाचा आलेख. अणुऊर्जेचे स्रोतपुस्तक, लेखक : सॅम्युएल ग्लास्टन, प्रकरण–५: नैसर्गिक किरणोत्सार. किरणोत्सारी ऱ्हासाच्या प्रक्रियेत धनकांच्या संख्येमध्ये बदल होतो. त्यामुळे मूळ अणू हा उत्सर्जन झाल्यानंतर एका नवीन अणुमध्ये रूपांतरित होतो. कोणत्याही किरणोत्सारी पदार्थाचा ऱ्हास होण्याच्या प्रमाणावर ही गोष्ट अवलंबून असते की, तो किती शिल्लक राहील. अर्धायू (हाफ–लाइफ) म्हणजे अणुंच्या ऱ्हासानंतर त्यांची संख्या अर्धी राहण्यापर्यंतचा कालावधी होय. म्हणजेच असा कालावधी की, ज्यामुळे किरणोत्सर्जन क्षमतेचा

ऱ्हास होऊन ती निम्म्यावर येते. उदा. रेडियम-२२६ चे अर्धायू १६०० वर्षे आहे. समजा सुरुवातीस रेडियम-२२६ चे १०० अणू आपल्याजवळ आहेत. तर १६०० वर्षांनंतर फक्त ५० अणू शिल्लक राहतील व ३२०० वर्षांनंतर त्यातील फक्त २५ अणूच शिल्लक राहतील.




युरेनियमचे अर्धायुष्य ४.५ अब्ज वर्षे आहे, जे जवळपास पृथ्वीच्या अंदाजित वयाइतकेच आहे. याचाच अर्थ असा की, पृथ्वीच्या जन्माच्या वेळेस अस्तित्वात असलेल्या युरेनियमपैकी किमान अर्धेतरी अजूनही अस्तित्वात असायला हवे. म्हणून निरनिराळी किरणोत्सारी उत्पादने विघटित होत असता, त्यांच्या जन्मदात्यांच्या विघटन उत्पन्नांनी ती बदलली जात असतात. इथे ह्याची दखल घेणे सुरस ठरेल की, केवळ तीनच किरणोत्सारी मालिका निसर्गात अस्तित्वात आहेत. युरेनियम, थोरियम आणि ॲक्टिनियम. वास्तविक चार शक्य असायला हव्यात. चवथ्या मालिकेतील सर्वात दीर्घायू सदस्याचे अर्धायू २० लक्ष वर्षे आहे, म्हणून पृथ्वीच्या जन्मापासून आजवर तो जवळपास पूर्णपणे विघटित होऊन गेलेला असावा. त्यामुळे अशी मालिका निसर्गतः आढळून येत नाही.

अति-क्रियाशील मूलद्रव्ये नाहीशी होतात, तर कमी क्रियाशील मूलद्रव्ये दीर्घकाळ टिकून राहतात. ज्या अणूंचे अर्धायू दीर्घ आहे त्यांची किरणोत्सर्जनक्षमता कमी प्रतीची असते आणि ज्या अणूंचे अर्धायू अल्प आहे त्यांची किरणोत्सर्जन क्षमता जास्त उच्च प्रतीची असते. म्हणूनच किरणोत्सारी पदार्थाचे अर्धायू आणि त्याच्या किरणोत्सर्जन क्षमतेचा स्तर हे परस्परविरोधी प्रमाणात असतात. युरेनियम २३८ चे अर्धायू ४५० कोटी वर्षे आहे. युरेनियमचा विविध १४ पातळींवर ऱ्हास होऊन त्याचे रूपांतर शिसे ह्या स्थिर समस्थानिकात होते. ह्या प्रक्रियेला अनेक अब्ज वर्षे लागतात. म्हणूनच तो टिकून आहे. मात्र, ९२ हून अधिक अणुक्रमांक असलेली, प्लुटोनियमसारखी अनेक मूलद्रव्ये आहेत, ज्यांची अर्धायुष्ये अल्प असल्यानेच आज निसर्गतः ती उपलब्ध नाहीत.

### किरणोत्सारी ऱ्हासदराचे निर्धारण

एखाद्या दिलेल्या नमुन्यातील प्रत्येक किरणोत्सारी अणू त्याच्या गर्भातून एक अल्फा अथवा एक बीटा कण विघटनादरम्यान बाहेर टाकतो. या सर्व वस्तुस्थितींशी सुसंगत असलेल्या गृहितकांवरच मापन पद्धती आधारलेल्या असतात. परिणामतः दिलेल्या वेळात विघटित होत असणाऱ्या अणूंची संख्या आणि त्यावरून विघटन दर, उत्सर्जित अल्फा किंवा बीटा कणांची गणना करून शोधून काढता येईल. प्रत्येक कणाची गणना करणे किरणोत्सार अभ्यासाचे दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे आणि याकरता अनेक उपकरणे अभिकल्पित केली गेलेली आहेत.

### विश्वकिरणे

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, बाह्य अवकाशातून येणाऱ्या भेदक (पेनेट्रेटिंग) प्रारणांचे अस्तित्व, चार्लस थॉमसन रीस विल्सन (१८६९-१९५९) यांनी केलेल्या विद्युत-दर्शक-यंत्रांसहितच्या साध्या प्रयोगांतून संवेदले गेले. रॉबर्ट अँड्र्यूज मिलिकन (१८६८-१९६३) या अमेरिकन नोबेल विजेत्या



भौतिकशास्त्रज्ञाने, अतिशय ऊर्जस्वल भारीत कणांच्या ह्या प्रारणांना 'विश्वकिरण' हे नाव दिले. त्यात निरनिराळ्या प्रकारची अणुकेंद्रके असतात, मात्र मुख्यत्वे धनक असतात. प्राथमिक विश्वकिरण वातावरणाशी परस्पर-कार्यरत होऊन दुय्यम किरणे निर्माण करतात.

होमी भाभा यांनी वॉल्टर हिटलर यांच्या सहयोगाने १९३७ साली प्रकाशित एका शोधनिबंधात विश्वकिरण वर्षावाच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले. पुढे ह्या वर्षावासच 'भाभा वर्षाव' हे नाव देण्यात आले. प्राथमिक कणांच्या एका वर्गालाच वापरले जाणारे 'मेसॉन' हे नाव भाभा यांनीच सुचवलेले होते.

विश्वकिरण हे अण्वंतर्गत ऊर्जस्वल भारीत कणांनी बनलेले असतात. यांचे मूळ पृथ्वीबाहेरील अवकाशात असते. पृथ्वीच्या वातावरणात आणि पृष्ठभागात प्रवेश करत असता ही किरणे अनेक दुय्यम कण निर्माण करतात. ऐतिहासिक काळात यांचे स्वरूप विद्युतचुंबकीय मानले गेले होते, त्यामुळे त्यांचे नाव 'विश्वकिरणे' असे पडले. बव्हंशी प्राथमिक विश्वकिरणे, पृथ्वीवरील आपल्या ओळखीच्या स्थिर अण्वंतर्गत कणांनीच बनलेली असतात. जसे की धनक, अणुगर्भ किंवा वीजक. मात्र त्यांतील एक लहानसा हिस्सा प्रतिपदार्थांचा बनलेला असतो. जसे की, धन-वीजक (पॉझिट्रॉन), प्रति-धनक (अँटिप्रोटॉन) इत्यादी. त्यांच्या नेमक्या स्वरूपावर संशोधन अजून सुरूच आहे. ८८% विश्वकिरणे धनक अथवा उद्‌जनच्या अणुगर्भांनी बनलेली असतात. १०% हेलियम अणुगर्भ अथवा अल्फा कणांनी बनलेली असतात. तर १% अवजड अणुगर्भांनी बनलेली असतात. उर्वरित १% विश्वकिरणे विजकांनीच बनलेली असतात. विश्वकिरणांची ऊर्जा १०२० वीजकव्होल्ट (eV) इतकी जास्त असू शकते.


१९३० ते १९५० दरम्यान, अणुगर्भ आणि त्याचे घटक यांबाबतच्या वैज्ञानिक अभ्यासात विश्वकिरणांनी महत्त्वाची भूमिका बजावली, कारण उच्च-ऊर्जा-कणांचे ते एकमेव स्रोत होते. अल्पजीवी अण्वंतर्गत कणांचा शोध विश्वकिरण आघातांमुळे लागला होता. १९५० नंतर आलेल्या शक्तिशाली कण-त्वरकांच्या आविष्करणानंतरही तपासकांनी विश्वकिरणांचा अभ्यास, मर्यादित प्रमाणात का होईना पण सुरुच ठेवला. ह्याचे मुख्य कारण विश्वकिरणांत असणारे ऊर्जेचे प्रमाणच होते. प्रायोगिक परिस्थितींमध्ये उपलब्ध होऊ शकणाऱ्या ऊर्जांपेक्षा प्रचंड प्रमाणात जास्त होते.


**मूलकीकरण**

ऊर्जा उत्सर्जनाद्वारे दुसऱ्या अणू किंवा रेणुमधील वीजक वेगळे केले जाऊ शकतात. अशा प्रकारे ते अणु-रेणूंना विद्युत-भारीत व क्रियाशील अवस्थेत आणून सोडतात. ह्या प्रक्रियेला मूलकीकरण (आयोनायझेशन) असे म्हणतात आणि हा प्रभाव घडवून आणणाऱ्या उत्सर्जनाला मूलकीकारक़ उत्सर्जन (आयोनायझिंग रेडिएशन) असे म्हणतात. मूलकीकरण करत असता उत्सर्जनातील ऊर्जा घटत जाते. त्यातील ऊर्जा पूर्णतः नाहीशी झाली की ते पदार्थात लुप्त होऊन जाते. त्यापूर्वी ते उत्सर्जन पदार्थात जे अंतर चालून जाते त्यावरून त्याची भेदकता समजत असते. ह्या किरणोत्सारी उत्सर्जनाची भेदकता पुढील कोष्टका प्रमाणे असते.

**मूलक-कारी प्रारणांची भेदकता**

| अ.क्र. | प्रकार | वर्णन | भेदकता | आवश्यक सुरक्षा ढाल | विद्युतभार |
|---|---|---|---|---|---|
| १ | अल्फा किरण | हेलियम अणुकेंद्रक | निम्न | त्वचा, कागद | धनात्मक |
| २ | बीटा किरण | विजक | मध्यम | १-५ मिमी अल्युमिनियम, कथिल व इतर हलके धातू | ऋणात्मक |
| ३ | क्ष-किरण | उच्च ऊर्जा, विद्युत चुंबकीय किरणोत्सार | उच्च | १० मिमी+ शिसे अथवा अवजड धातू, १ मी+ काँक्रीट | काही नाही |
| ४ | गॅमा किरण | अतीउच्च ऊर्जा, विद्युत चुंबकीय किरणोत्सार | अतीउच्च | १० मिमी+ शिसे अथवा अवजड धातू, १ मी+ काँक्रीट | काही नाही |
| ५ | विरक्तक | जलद अथवा मंद असतात | उच्चतम | अनेक मीटर काँक्रीट, पाणी, मेण(पॅराफीन) | काही नाही |




**प्रारणे पूर्णपणाने अडवण्यास समर्थ असलेले अडथळे**

**संदर्भः** http://urjasval.blogspot.com/

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

जीवनाबद्दल काहीतरी सांगणारा ध्वनी जेव्हा कानी पडतो, तेव्हा तो कर्णकटू नसतो. - कॉलेरिज

# वनदेवतेस पत्र

*वनाचे मानवी जीवनात किती महत्त्व आहे हे या लेखात विशद केले आहे. - संपादक*

प्रिय, वनदेवते,

सादर प्रणाम!

एकेकाळी होतं तुझं फार मोठं साम्राज्य या धरणीवर. इथंच वाढली आम्हा मानवांची संस्कृती. तुझ्या कुशीत ऋषीमुनी तप करीत आणि साधून घेत आत्महीत; म्हणून म्हटलं जात असे वनांना 'तपोवन'. पुराणांतरी अन् महाकाव्यातही पटते तुझी ओळख. तुझ्याच साक्षीनं चाहत होते आश्रम आणि गुरुकुलात ज्ञानकार्य. रामाचा वनवास केलास तूच सुसह्य. त्यालाही हवाच होता तुझा हिरवा सहवास. उगाच नाही महर्षी वाल्मिकींनी त्यास 'वनमित्र' म्हटलेलं! पंचवटीत त्यानं केलं दीर्घकाल वास्तव्य आणि ती भूमी झाली एक तीर्थक्षेत्र. वनावनात भेटले त्यास अनेक तपस्वी. त्यांच्या सत्संगानं मिळविलं आत्मज्ञान. त्याच्या चरणांनी पावन झाला आपला आश्रम अन् तपोवन या गोष्टीनेच तपस्व्यांना वाटली धन्यता. आपल्या जन्माची झाली सार्थकता... असं तुलाही वाटलं असेल ना, वनदेवते?

गोपाळकृष्णाचं वास्तव्य होते व्रजमंडलात. मधुबन, वृंदावन, तालवन, महावन, वसंतवन अशी अनेक वनं त्याच्या क्रीडांमुळे कळली जगाला अन् त्यांचीही झाली तीर्थस्थानं.

वनदेवते, तुला आठवतं - पांडवांनी खांडववन टाकलं होतं जाळून आणि वसविलं होतं तिथं इंद्रप्रस्थ... वन जाळलं याची शिक्षा म्हणून की काय पुढे त्यांना भोगावा लागला वनवास! तोही तब्बल बारा वर्षे! काम्यक, चैत्ररथ, द्वैत, नैमिष, कदली, सौगंधिक... अशा अनेक वनांत घालवावा लागला काळ त्यांना. वनदेवते, सारे जगण्याचे संदर्भ मानवांचे आहेत तुझ्याशी निगडित. प्राचीनकाळी राजे-महाराजे येत तुला भेटायला. तेव्हा करीत मृगया... तेव्हा त्यांचीही कामक्रीडा रंगत असेल, नाही? सधन नागरिकांचा वनविहारही चालत असेल ना? बहुतेक जण वृद्धपणी वनात जाऊन राहत. 'वानप्रस्थाश्रम' स्वीकारीत. आम्हाला तर साधी सावलीही दुरापास्त! आमच्या संस्कृतीत तू अशी मिसळून गेलेस की, तुझ्याशिवाय जगणं अशक्यच.

प्राचीन साहित्यात स्वर्गाच्या सौंदर्याची शोभा वर्णन केलीय. तिथल्या नंदनवनाची महती काय वर्णावी? या धरतीवरही तुझं वैभव होतं अफाट पसरलेलं! ते आम्हीच लुटत राहिलो. म्हणूनच कुणा दैवीभक्त ऋषीनं तुला 'वनदुर्गा' म्हणून तुझी केली असेल पूजा. 'वनदुर्गा उपनिषदा'त हे वनदेवते! तुझ्या मंत्राचा विनियोग सांगितलाय.

आम्ही वाचलंय 'जातककथां' त की, तू गौतम बुद्धाला देत होतीस अन्न आणि वस्त्रं. एवढंच नाही तर दिलीप राजाची तू सेवा करीत होतीस, असं म्हटलंय कविकुलगुरु कालिदासानं आपल्या 'रघुवंशा'त.

हे वनदेवते, शकुंतलेचा दुष्यंताशी गांधर्वविवाह तुझ्याच साक्षीनं झाला. त्यावेळी दिलीस तू तिला रेशमी वस्त्रं अन् अलंकार असंही 'शाकुंतला'त वाचायला मिळते. सीता रामासह निघाली वनवासाला जाण्यासाठी तेव्हा तूच दिलं होतंस ना वचन सीतेचं रक्षण करण्याचं?

'वनस्पती माँ' म्हणून करतात आदिवासी तुझी भक्ती. दगडांचा ढीग करून त्यावर ठेवतात झाडांच्या फांद्या. हेच तुझं प्रतीक! जाता-येता ते आदिवासी दगड ठेवून टाकतात फांद्या. राखतात तुझा मान. असं न केल्यास तू कोपतेस, म्हणतात तुझा दूत वाघ. तो तुझ्या वैऱ्यांना

मारतो ठार, असंही समजतात. तुझ्या जवळपास गाणं गायिलं कुणी किंवा वाजविली शीळ तर का रागवतेस ग?

तुझ्या वनातल्या फुलांची माळ कृष्णालाही फार प्रिय. 'सर्व ऋतूतल्या फुलांनी उज्ज्वल असणारी, मध्यभागी मोठा पुष्पगुच्छ असणारी, गुडघ्यापर्यंत रुळणारी अशी पुष्पमाला' असं लक्षण त्या मालेचं! म्हणूनच भगवंताचं एक नाव आम्ही ठेवलंय - वनमाळी.

हे वनदेवते, या सगळ्या गोष्टी प्राचीन. जलाशय, वाळवंटे आणि हिमाच्छादित प्रदेश वगळता होता बहुतेक भूभाग घनदाट अरण्यांनी व्यापलेला. आमच्या संस्कृतीचा जसजसा होत गेला विकास, तसतसा वनस्पतीसृष्टीवर घाव घालू लागला माणूस. तरीही तू गप्प राहिलीस. तुझं आक्रंदणं पाषाण हृदयांपर्यंत गेलं, पण... वनस्पतींचा होऊ लागला नाश. वाढू लागली लोकसंख्या. गावं अन् नगर वसविण्यासाठी नष्ट केली जाऊ लागली तुझी वनसंपत्ती. असे आम्ही पंडित! ('अरण्यपंडित' म्हण हवं तर!) सध्या जी चालू आहे जंगलतोड, ती आहे हानीकारक. तोल तुझाच नाही, आमचाही बिघडलाय, वनदेवते! आयुर्वेदाची परंपरा आहे आमची नाव घेण्याजोगी. जगानं तोंडात बोट घालावं आश्चर्यानं अशी. महर्षी भारद्वाजांचा शिष्य पुनर्वसू आत्रेय. हा अनेक ऋषीमुनींसह हिमालयातील दऱ्याखोऱ्यांत हिंडत असे औषधी वनस्पतींचं निरीक्षण करण्यासाठी. 'बृहदारण्यकोपनिषदा'त वनस्पतींच्या अंतरंग रचनेविषयी, त्यांच्या जीवनाविषयी आहे थोडंसं विवेचन. त्यांनी हे वनदेवते, मानवी शरीराशी केलीय वनस्पतींची तुलना. महर्षी उदयनांच्या मते वृक्षांच्या अवस्था अशा आहेत. जन्म, मृत्यू, रोग, प्रवृत्ती, जागरण, निवृत्ती...वगैरे.

वनदेवते, 'महाभारता'त म्हटलंय, वनस्पती सजीव असून त्यांच्या काही हालचाली सजीव प्राण्यांप्रमाणे होतात. एखादा विषय रम्य करण्यासाठी पुराणकारांनी उपयोग केलाय वनस्पतींविषयक उपमा देऊन, दृष्टान्त सांगून. चित्रांत रंगवतो तुझं दैवी लावण्य. चित्रपटात बघतो तुझी पृथ्वीवरील संपन्नता... पण आम्ही शिकतो काय? हे वनदेवते, सुसंस्कृतीत राहूनही एकमेकांना 'जंगली' म्हणतो... किंवा 'रानटी'.

तू वनाची अधिष्ठात्री देवी! आम्हाला दे वनभोजनाचं आमंत्रण. बघू देत आम्हाला वनपशू. लाभू दे आम्हाला एकान्तवास. मिळू दे 'खरा' वनवास. शिकव आम्हास तू वनविद्या. जी शिकून कृतार्थ झाले सुश्रूत, चरक, वराहमिहीर... अशी थोर भक्तमंडळी तुझी. आम्हाला कळत नाही वनविज्ञान. कळलं तरी दुर्लक्ष करतो. तुझ्या भक्तिस्तव आता 'रान' उठवलं पाहिजे. रान भारावं तसं प्रत्येक माणूस तुझ्यासाठी झालं पाहिजे वेडं! आमच्या मनातल्या रिकाम्या रानी अविचार माजलेत पण फार. माजलेल्या रानदांडग्यांना आवर तूच! तुझं वैभव ते विकताहेत. आम्ही झालो आहोत माणसं रानभरी. दाखव आम्हाला तुझ्या रानवाटा... फुलाफुळांची दे प्रतिकात्मक शिकवण. तुझे लाडके सुपुत्र अन् पुत्री तुझ्याच वाटेनं गेले. जगले. त्यांच्या आयुष्याचं केलं त्यांनी सोनं. लोपामुद्रा ही जगातली पहिली सर्जन स्त्री! तिनं कसे केले असतील रुग्णांवर उपचार, सांगशील का तू कधी या दीडशहाण्या जगाला? अगस्ती ऋषींच्या या पत्नीनं किती केली असेल साधना? होती का तिच्याकडे सुंदर प्रयोगशाळा? तुझ्यामुळेच गवसला असेल तिला ज्ञानठेवा निराळा आणि कवींनी तुझं गुणगान गाऊन नोंदवून ठेवलीत अनेक ऋणं तुझी. ज्ञानदेवांनी वसंतबहार सांगताना वैराग्याची रंगवलीय वसंतशोभा! 'गीते'तील संसारवृक्षाची कल्पना विलोभनीय खरी, पण तिचं सौंदर्य वाढवलं- आमच्या माउलींनी...

आम्ही रमतो विषय पल्लवीत. मनुष्यशाखा फोफावल्या तरी प्रमादांची पानं सावली धरत नाहीत कुणावर... ते माया काय करणार? खाली पानं, वरती मूळं... अशी आमची संसारवृक्षाप्रमाणे अवस्था (उलट्या काळजाचे प्राणी).

वनदेवते, आमच्या तुकोबांनीही निळोबा, सावता माळी यांच्यासारखंच आळवलंय तुला. साधुसंतांची तू सखी-सोयरीधायरी...अन् आमची? आमची तू मायमाउली. साक्षात प्राण. पंचमहाभूतं सामावलीत तुझ्यात. तुला पुनःपुन्हा प्रणाम असो.

'गजबजा सांडलिया। वसवी वनस्थळिया।।' हे

---

गातात. ज्ञानोबांनी तुझं महत्त्व सांगितलंय. जिथं गजबज नाही अशा वनस्थळी राहावं. शरीराचे अवयव सोबतीला असल्यावर इतरांची संगत हवीच कशाला? हे वनदेवी, जे जे शक्य आहे - ते ते घेतो आम्ही तुझ्याकडून. फक्त घेण्यातच आमच्या पिढ्या होताहेत बरबाद. देतोय का? नाव नको ! निसर्गाचं शोषण हेच आमचं जीवन. तुझ्या ऋतुचक्रांत आणतो आहोत अडथळे. धरतीची सुपिकता घालवतोय. शुद्ध हवेला लाजवतोय. आम्हीच आमचा आरंभलाय सर्वनाश. मधमाशा गोळा करतात मध, पण दहा पिढ्यांसाठी तो नसतो... नाही तर आम्ही! निष्कारण उडवतो गाड्या. वाढवतो प्रदूषण. करतो तुला बेजार. पण तू गप्प. तुला ठाऊक आहे ही मृत्यूदरी खोदतोय माणूस, तीत मरणार आहे तोच... केव्हातरी...

आमचा नाश थांबविण्यासाठी तुझा सांभाळ करणं हीच खरी पूजा! 'वृक्षायुर्वेदा'त वृक्षमहिमा वर्णन केलाय-

**एतत्सर्वं परिज्ञाय वृक्षारोपं समाचरेत्।**
**धर्मार्थकाममोक्षाणां द्रुमेभ्यः साधनं यतः।।७।।**

ज्या अर्थी धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या चतुर्विध पुरुषार्थांचं साधन वृक्षापासूनच प्राप्त होणारं आहे त्याअर्थी साऱ्या गोष्टींचा विचार करून प्रत्येक मनुष्यानं झाड लावून त्याची जोपासना करावी. कारण वृक्ष हा 'दशपुत्रासम' सुख देतो, असं ऋषीमुनींचं मत आहे. वनदेवते, आमच्या काही ग्रंथांमध्ये तर अशी मजेदार माहिती आहे म्हणून सांगू! दोन वटवृक्ष लावल्यामुळे शिवलोकांत अप्सरांकडून सेवा घेत वास्तव्य करता येतं. निंबवृक्ष लावल्यास सूर्यलोकात वास होतो. औदुंबर लावणाऱ्याला राजसूय यज्ञाचं फळ मिळतं. तुळशी लावल्यास वैकुंठप्राप्ती होते. बिल्ववृक्ष लावल्यास घरात सदैव लक्ष्मी नांदते... बाप रे! काय ही आमिषं! वृक्षारोपण हे एक पुण्यकर्म आहे. एवढाच त्याचा अर्थ!

वनदेवते, 'विष्णुधर्मोत्तर' नामक पुराणात तर याहूनही मजेदार किस्से आहेत. वृक्षांच्या 'आवडी' सांगितल्यात. सुंदर स्त्रीचा लत्ताप्रहार आवडतो अशोकवृक्षाला. बकुळाची तऱ्हाच वेगळी. त्याला आवडते सुंदर स्त्रीच्या मुखातील मद्याची गुळणी. माशांनी युक्त असं थंड पाणी आंब्याला, तर बोरीच्या झाडास हवं ज्येष्ठमधयुक्त पाणी. सप्तपर्णी वृक्षाला दूध तर कवठ अन् बेलास - गूळपाणी. तर खजूर, नारळ, बांबू, कर्दळी यांना आवडतं मीठपाणी. स्त्रीच्या आलिंगनामुळे फुलतात कोरांटी. हस्तस्पर्शानं माकंदवृक्ष, मदरागानं चाफा, शब्दांनी कर्णिकार, गाण्यामुळे अन् प्रियाळू हसण्यामुळे नमेरू फुलतात. असं 'शिवतत्त्वरत्नाकरा'त सांगितलंय हे ठाऊक आहे ना तुला?

आम्हाला ठाऊक आहे घरात चार-सहा कुंड्या शोभेसाठी ठेवणं. त्यातली रोपं, नवसंस्कृतीप्रमाणेच बहुधा खुजी असणं. विशाल अरण्यात जीव घाबराघुबरा होतो. 'अभयारण्या'तही भय वाटतं आम्हाला.

हे वनदेवते, 'चिपको आंदोलन' करूनही थांबत नाही जंगलतोड. आता तूच सांग काय करावं अशा हिंसक माणसांचं? आम्हा मानवांचा कायदा गाढव. शहाण्यास भीती कोर्टकचेऱ्यांची. नीती आमच्या आसपासही नाही फिरकत. तुलाही आम्ही नकोसे झालो तर प्राण राहतील का आमचे? शुद्ध हवा, पाणी मिळणार कुठून? म्हणून विनंती की, 'मेघ गर्जना करोत. पावसाच्या सरींवर सरी येवोत. वाराही वाहू दे. सर्व प्रकारची भीती नाहीशी करून टाकणारी अशी ही शांत वनस्पती माझ्या हृदयात वास करून राहिलीय. इतकं मला प्रेम वाटतं हे वनदेवते, तुझ्याबद्दल!' एवढीच प्रार्थना ऐकून घे. आम्हास सद्बुद्धी दे. एक झाड तोडलं तर चार झाडं त्याचवेळी लावायची प्रेरणा दे... अधिक काय मागावं? तुझं ऋण कसं फेडावं? कृपा असू दे...

तुझाच, सावली शोधणारा मानव!...

**- अरविन्द दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट,
साहिल हॉस्पिटल जवळ,
ठाणे (प.).४०० ६०१
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

•••

# जपानी विद्यार्थ्यांचे भारतीय हायकू

*क्योटो सांग्यो विद्यापीठ, जपान व विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रमांतर्गत जपानी विद्यार्थ्यांचा चमू दि. ४ ते १५ सप्टेंबर २०१७ या कालावधीत वि.प्र.मं.च्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात दाखल झाला होता. या दहा दिवसात जपानी विद्यार्थ्यांनी इंग्रजी संवाद कौशल्याचे धडे घेतले. या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवतानाचे अनुभव प्रस्तुत लेखात मांडले आहेत. - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे आणि जपानस्थित क्योटो-सांग्यो विद्यापीठ यांच्या सांस्कृतिक आदानप्रदान (Cultural Exchange) कार्यक्रमांतर्गत जपानच्या क्योटो सांग्यो विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संस्कृती अध्ययन केंद्राच्या १५ विद्यार्थ्यांनी नुकतीच (४ सप्टें. ते १५ सप्टेंबर) रोजी भेट दिली. डॉ. कियोकोनी शिगा हे पण या चमूबरोबर आले होते. डॉ. शिगा क्योटो सांग्यो विद्यापीठात भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आहेत.

या विद्यार्थ्यांना १५ दिवस भारतात राहण्याची संधी मिळते व या काळात ही मुले भारतातील भाषा, संस्कृती, उत्सव लोकसंस्कृती यांचा अभ्यास करतात. डॉ. विजय बेडेकर यांच्या कल्पक प्रतिभेतून या विद्यार्थ्यांचा १५ दिवसांचा अभ्यासक्रम ठरवला गेला असून, मागच्या दहा वर्षांपासून ही जपानी विद्यार्थ्यांची भारत भेट ठरवली जाते. हिंदी, इंग्रजी, योग अशा विषयांसोबतच विविध शिक्षणसंस्थांना भेटी, विद्यार्थ्यांशी व प्राध्यापकांशी चर्चा यांची रेलचेल या १५ दिवसांत होते. यावेळी विद्यार्थ्यांना उपवन तलावाजवळ नेऊन गणपती विसर्जन देखील दाखवण्यात आले.

मी या मुलांना इंग्रजी संभाषण कौशल्य (Coversational English Skills) शिकवले. जपानी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची संवाद कौशल्ये हस्तगत करण्यासाठी मी १५ दिवसांचा छोटेखानी अभ्यासक्रम तयार केला. मात्र केवळ व्यावहारिक इंग्रजीचा अभ्यास करण्यासोबतच इंग्रजी साहित्य व भारतीयांचं इंग्रजी साहित्य, इंग्रजी कविता अशा विषयांचाही मी समावेश केला होता.

भारतीयांची इंग्रजी कविता आणि साहित्य या विषयावर एक व्याख्यान तयार करून त्यात थोर साहित्यिक रवीन्द्रनाथ टागोर यांच्या प्रसिद्ध 'काबुलीवाला' या इंग्रजी कथेचा समावेश केला. माझ्या जपानी वर्गातील इकूमा, शोया, कानो, व आयुमी या विद्यार्थ्यांना 'काबुलीवाला' या कथेची पात्रं वाटून दिली. पहिल्यांदा या कथेचा छोटा गोषवारा (synopsis) एका A4 साईजच्या पानावर छापून विद्यार्थ्यांना वाचायला दिला. या मुलांनी ही कथा अत्यंत सुंदरपणे सादर केली. नाटक शिकवताना माझा कला शाखेच्या विद्यार्थांचा अनुभव गाठीशी होताच, पण जपानी मुलांना भारतीय इंग्रजी साहित्य शिकवणे हा विलक्षण अनुभव होता. सोबतच EPIC चॅनेलने तयार केलेल्या Stories from Ravindranath Tagore या मालिकेचा 'काबुलीवाला' हा तीन मिनिटांचा व्हिडीओ दाखवला.

पुढील एका तासिकेत दिलीप चित्रे यांच्या "On Felling of Banayan Tree" ही कविता मी शिकवली. जपानी संस्कृती व भारतीय संस्कृतीत एक विलक्षण साम्य आहे व ते म्हणजे निसर्गावर प्रेम. जपानी संस्कृतीत झाड, डोंगर, लता, फुलं यांना खूप महत्त्व आहे. दिलीप चित्रे यांच्या उपरोक्त कवितेची मी या विद्यार्थ्यांना

ओळख करून दिली. विशाल वटवृक्षाच्या पारंब्या व मूळं ही खोलवर रुजलेली आहेत. ते झाड तोडत असताना लहान मुलांच्या मनावर ते झाडाचं मरणं कोरलं गेलं. जपानी मुलांनी ही कविता फार वेगळ्या दृष्टीकोनातून अनुभवली.


शेवटच्या दिवशी मी एक छोटासा प्रयोग केला. माझ्या वर्गातील सर्व जपानी मुलांना मी इंग्रजीत व जपानी भाषेत प्रत्येकी एक हायकू लिहायला लावला. हे हायकू त्यांच्या भारतातील अनुभवावर आधारित असायला पाहिजे अशी अट होती. मुलांनी त्यांना लाभलेल्या भारतातील संचितावर अत्यंत सुंदर व बोलके हायकू लिहिले. प्रस्तुत लेखात त्या सर्व हायकूंचे विश्लेषण करून भारताकडे जपानी विद्यार्थी कुठल्या दृष्टीकोनातून पाहतात हे समजून घेण्याचा मानस आहे.

जपानी विद्यार्थ्यांनी एकूणच भारतातील खाद्य संस्कृती, भारतीय लोकांचा स्वभाव, धर्म, देवता, त्यांचे भारतातील अनुभव या विषयावर विलक्षण सुंदर हायकू लिहिले. त्यांची मूळ अभिव्यक्तीची भाषा जपानी असल्यामुळे त्यांचं इंग्रजी भाषांतर जरा तांत्रिक झालंय. परंतु भावनेचा अर्क फक्त तीन ओळीत साकारण्यात ते यशस्वी झाले आहेत.

नुकतंच जपानी मूळाच्या इंग्रजी कादंबरीकार काझुओ इशुगूरो यांना २०१७ सालचं साहित्याचं नोबेल मिळालं. हारुकी मुराकामी या प्रथितयश जपानी कादंबरीकाराला नोबेलच्या निवड समितीने अजून एकदा हुलकावणी दिली. या परीप्रेक्ष्यात या जपानी मुलांनी लिहिलेले हायकू अभ्यासल्यास त्यांची अभिव्यक्ती व जपानी भाषेच्या हिरागाना व काताकाना या लिपीचा डौलही सहज डोळ्यात भरतो.

माझ्या वर्गातील १५ जपानी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या एकेका हायकूचा धावता आढावा घेणं हा फार रोचक अनुभव आहे.


मियाको मुराकामी या विद्यार्थिनीने एक सुंदर हायकू लिहिला. त्यात ती म्हणते –




Scanned by CamScanner

या Cultural Exchange Programme मुळे आमची मनं जुळली. जपान व भारताचे बंध जुळले व शेवटी ती लिहिते 'Morya'. महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी जपानी विद्यार्थ्यांशी १५ दिवसात चांगली गट्टी केली होती. कुठेही जाताना वा येताना 'गणपतीबाप्पा – मोरया' ही घोषणा ठरलेली. हा 'मोरया' शब्द या मुलीने हायकूमध्ये किती चपखल बसवला. मला वाटतं की या Exchange Programme चं जर तीन शब्दात फलित विचारलं तर त्याला उत्तर म्हणून हे हायकू द्यावं लागेल.

इकुमा सुगीउरा या विद्यार्थ्याने 'टांका' नावाचा हायकू सारखाच एक प्रकार लिहिला. यात ओळींचे गणित हे ५-७ ५-७७ असं असतं. तो लिहितो –




यातून त्याला भारतीयांची गतीशिलता व वेगवान हालचाली अधोरेखित करायच्या आहेत. याला जरा विस्ताराने सांग म्हटल्यावर इक्मा म्हणाला,– जपानी लोक हे खूप शांत असतात. कुणी बोलल्याशिवाय बोलत नाहीत. विनाकारण हासत नाहीत. पण भारतीय लोक खूपच चंचल, बडबडे व गतिशील आहेत. थोडक्यात ससा व कासव या गोष्टीसारखं शांततेत दीर्घकाळ काम करायचं हा जपानी माणसांचा स्वभाव. या उलट भारतीयांचा स्वभाव आरंभशूर आहे.

शोया कोफूजी या विद्यार्थ्याने भारतीय मानसिकतेचा अचूक वेध घेतला. फक्त १५ दिवसांच्या सहवासात त्याला भारतीयांबद्दल एक गोष्ट समजली व ती म्हणजे –



The indian people always has India's God in their mind


भारतीय लोकांच्या मनात कायम कुठला तरी देव असतो. या हायकूमध्ये शोयाने गणपतीचे एक सुंदर चित्र रेखाटलं.

ओगो नात्सूयो या विद्यार्थिनीने भारतीयांच्या अजून एका गुणावर लक्ष वेधलंय. ती म्हणते –





गणपती विसर्जनाच्या कालावधीत ही जपानी मुलं आल्यामुळे त्यांना भारतीय नाचताना दिसले व कुठलाही प्रसंग असो भारतीयांची पाऊले संगीतावर थिरकतात.

आयूमी नगारा या विद्यार्थिनीने लिहिलं –




भारतात येऊन झालेला आनंद व हे कधीही न विसरण्याचं वचन आयूमी देते.


रिकाको मात्सूका हीने भारतीयांच्या दयाळूपणावर लिहिलं. तिच्या रेखाटनात भारताचा ध्वज आहे व एका जोडप्याच्या हृदयाला लालरंगात तिने रेखाटलंय.




अया नावाच्या मुलीने उपमा अलंकार वापरून भारतीयांच्या स्मितहास्याचं वर्णन केलंय. ती म्हणते -





हारुका मिझुशिमा या विद्यार्थिनीने भारतीयांच्या चहाप्रती असलेल्या विलक्षण वेडाबद्दल लिहिलंय -




१५ दिवसात तिला सुद्धा चहाची एवढी सवय लागली की तिच्या मते ती चहामध्ये आकंठ बुडाली आहे.

कानो त्सुकाडा या विद्यार्थिनीने भारतीय लोक खूप चांगले व दयाळू आहेत असं लिहिलंय -





दुःखाला आमंत्रण द्यावे लागत नाही! - टी. फुलर

अडाचीफूमी या विद्यार्थिनीने भारतातील वातावरण खूप आवडलं आणि भारतीय लोक खूप छान आहेत असं ती लिहिते -




फूमीने रेखाटलेल्या हायकूमध्ये अनेक गोष्टींचा कोलाज आहे.

नाना नावाची जपानी विद्यार्थिनी लिहिते -





भारतीय या जपानी विद्यार्थ्यांकडे विशेषतः मोठ्या कुतूहलाने पाहतात असं नानाला म्हणायचंय.

भारतीय मानसिकतेचा आलेला अनुभव रेखाटताना त्यांनी भारतीयांची व्यवच्छेदक लक्षणं टिपली आहेत. भारतीयांची वागण्याची पद्धत, विचार करण्याची पद्धत व सवयी यावर हायकूमध्ये या जपानी मुलांनी सुंदरपणे भाष्य केलं आहे.


काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या भारतातील अनुभवांवर आणि आलेल्या अडचणींवर देखील लिहिलं.

मोका फूजी नावाची विद्यार्थिनी लिहिते -




महाविद्यालयापासून जपानी मुलांच्या राहण्याची व्यवस्था अर्धा तास अंतरावर होती. सकाळी एक गाडी त्यांना आणायला जात असे. मात्र पहिल्या आठवड्यानंतर नाशिकच्या बुद्ध विहाराला भेट, मुंबई दर्शन इत्यादी भेटींमुळे त्यांना आणायला जाणारी गाडी लवकर जात असे. मग त्यांची झोप पूर्ण होत नसे. म्हणून ती हे हायकू लिहिते. -

मिसूझू त्सुजिहारा ही विद्यार्थिनी जेवताना (पोळी) चपाती हाताने खाण्यात येणाऱ्या अडचणीबद्दल लिहिते.




जपानी लोक काट्या चमच्याने खातात. त्यांना इथे चपाती खाताना सुरुवातीला अडचण आली. मात्र मिसूझू म्हणते त्याप्रमाणे चपाती तोडायला ती हळूहळू शिकली व छान भारतीय पद्धतीने जेवू शकते.





यूकी त्सुकाया विद्यार्थिनीने भारतीय जेवणावर भाष्य केलंय–

तिने भारतीय जेवणाचं एक ताट रेखाटलंय.

वरील सर्व हायकूंमधून जपानी विद्यार्थ्यांनी त्यांचं भारतीय भावविश्व रेखाटलंय. अत्यंत कमी शब्दात मोठा सारगर्भ अर्थ सूत्ररुपाने हायकूमध्ये रेखाटण्याची जपानींची विलक्षण कला मनाला मोहून टाकणारी आहे.

शिरीष पै या विख्यात मराठी कवयित्रीने जपानी हायकू हा प्रकार मराठीत आणला व विलक्षण सुंदरपणे हाताळला. त्यांचे नुकतेच दुःखद निधन झालं. त्यांनी लिहिलंय –




सहन होत नाही<br>
कुणाचं तरी फावड्यानं<br>
रस्त्यावरलं माती खरडणं –

खिडकीपाशी निमूट बसणे<br>
एका मागून एक फुलांना<br>
गळताना बघणे.

पोपटी पालवी बघताना,<br>
भरून आले डोळे,<br>
तिचे थोडे दिवस उरले...

कधी सुकलं हे झाड,<br>
ज्याची सुगंधी फुले<br>
मी फांदी वाकवून हूंगत गेले...

जाग आली,<br>
आपल्या श्वासोच्छ्वासाची<br>
मध्यरात्री भीती वाटली.

.....

शिरीष पै यांचे हे विलक्षण सुंदर हायकू मराठीजनांना परिचित आहेत. जपानी विद्यार्थ्यांच्या या हायकू लेखनाच्या वेगळ्या उपक्रमाने अनेक तरल व नाजूक धागे समोर आले. ही एक प्रकारे शिरीष पै या मराठी लेखिकेला जपानी विद्यार्थ्यांची शब्दकुसुमांची श्रद्धांजली म्हणायला हवी.

एक मात्र नक्की, मला या उपक्रमामुळे समृद्ध होता आलं व या १५ जपानी विद्यार्थ्यांसोबत व त्यांचे प्राध्यापक डॉ. कियोकोनी शिगा यांच्यासोबत ऋणानुबंध जोडता आले.

**– प्रा. प्रशांत धर्माधिकारी**<br>
इंग्रजी विभाग,<br>
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे<br>
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

●●●

एकांतवासाने मन ताजेतवाने होते; पण एकलकोंडेपणाने ते मरण पावते! – जे. रॉक्स

# आजचे शिक्षण : ज्ञान देणारे की मार्कस् कमावणारे?

*आजच्या शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करणारा लेख - संपादक*

शाळेत असताना आम्ही नेमाने एक सुविचार फळ्यावर लिहायचो. त्यातील एक सुविचार असा होता की, 'ज्ञान तेथे मान'. याचा अर्थ असा की, माणसाने आपली दृष्टी आपला सहभाग शिक्षण मिळत असेल अशा ठिकाणी प्रथम जावे, जेथे आपले व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होईल. पण आज मात्र या सुविचाराचा अर्थ पूर्णतः बदलून गेला आहे. आजकाल 'ज्ञान तेथे मान' (सहभाग) तर नाहीच पण उत्तम ज्ञान असलेल्या एका हुशार व्यक्तिमत्त्वाला 'मान' सुद्धा मिळत नाही. असे म्हणतात ही, माणसाच्या गुणांमुळे त्याचे व्यक्तिमत्त्व बहरते, फुलून येते. परंतु आजच्या या आधुनिक जगात शब्दांचेही स्वरूप पालटून गेले. आज या माणसांतील गुणांमुळे नव्हे, तर त्याचे परीक्षेतील गुण किती? यावरून त्याला उत्तम ठरवले जाते.

आजचा विद्यार्थी हा आपल्या स्वतंत्र लोकशाही राष्ट्राचा भावी नागरिक आहे. वयाच्या अठराव्या वर्षीच त्याला मतदानाचा अधिकार मिळाला आहे. म्हणून विद्यार्थिदशेतच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास होणे आवश्यक आहे. त्याला स्वतंत्रपणे निर्णय घेता आला पाहिजे. आजचे शिक्षण अशा प्रकारचे भावी नागरिक तयार करू शकत आहे का? या प्रश्नाला आपण छातीठोकपणे 'हो' असे उत्तर देऊ शकत नाही. कारण आजची विद्यालये, महाविद्यालये विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्वे फुलवत नाहीत, तर केवळ परीक्षांच्या कारखान्यातून बेकारांच्या झुंडी निर्माण करीत आहेत.

आजची आपली शिक्षणपद्धती पाहा ना! अगदी बालवाडीपासून ते पदवीधर होईपर्यंत पळावेच लागते. वर्षभर विद्यार्थी कसा अभ्यास करतो, त्याला किती विषय आवडत आहेत, एखादा विषय किती आकलन होतोय हे न बघता वर्षाच्या शेवटी एकदम वार्षिक परीक्षा त्याचं पुढील वर्षाचं भवितव्य ठरवते. प्राथमिक - माध्यमिक महत्त्व काय वर्णावं? विद्यार्थ्यांच्या जीवनाचा आलेखच बदलून जातो. बरं ही परीक्षा पद्धती जरी त्याच्या पात्रतेची परिपूर्ण कसोटी असेल तर गोष्ट वेगळी! तेही नाही! हल्लीच्या परीक्षा-पद्धतीत भर आहे तो स्मरणशक्तीवर. विचारशक्ती, कल्पनाशक्ती, सृजनशीलता यांचा विचारच फारसा केला जात नाही. प्रत्येकाचा कल, आवड, पात्रता याप्रमाणेच अभ्यासक्रम असावा. पण नाही; सगळ्यांना सरसकट एकच धोपटमार्ग.

आज लहान मुलांच्या जीवनातील आनंद, मजा सर्व काही शिक्षणपद्धतीने ओरबाडून घेतलं आहे. एखाद्या नावाजलेल्या शाळेतील पूर्व-प्राथमिक शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी अडीच-तीन वर्षांच्या बाळालाही परीक्षेला तोंड द्यावे लागते. लहान मुलांचाही 'Interview' घेऊन त्यातील प्रश्नांना योग्य रीतीने अचूक उत्तरे दिली तर त्याला शाळेत प्रवेश मिळतो. खरे पाहता लहान मुले घरातल्यांना निरागसपणे कितीतरी प्रश्न विचारत असतात. तेव्हा ती खऱ्या अर्थाने ज्ञानार्थी असतात. पण पालक मात्र त्यांना योग्य प्रतिक्रिया देत नाहीत. ''तुला काय करायचे आहे? किती प्रश्न पडतात तुला? मोठा झालास / झालीस की सगळं आपोआप समजेल. आता फक्त तू तुझं अभ्यासाचं काम कर. चांगले मार्क्स् मिळवायचे आहेत ह्या परीक्षेत.'' ही अशी चुकीची उत्तरे पालकांकडून

ज्यांना उदात्त विचारांची संगत मिळाली आहे, ते कधीच एकलकोंडे नसतात. - सर पी. सिडने

दिली जातात. असे पालकच मुलांना 'परीक्षार्थी' बनवत असतात. अरे मोठं झाल्यावर सगळंच आपोआप समजायला लागतं, पण त्याच्या मोठे होण्याचा प्रक्रियेत तुमचा काय सहभाग आहे? केवळ शिक्षणासाठी पैसा खर्च करणे, मोठ्या ठिकाणी क्लासेस लावणे, पाहिजे त्या गोष्टी आणून देणे, यातच सगळं येत नाही; तर मुलाला योग्य संस्कार लावणे, चांगल्या सवयी शिकवणे, प्रश्नांची योग्य उत्तरे देणे हे सुद्धा संगोपनात येतं. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम त्यांच्या 'आदर्शाच्या शोधात' या लेखात असे सांगतात की,'लहानपणी मुले आपल्या आईवडिलांना आणि शिक्षकांनाच आदर्श मानत असतात. बालक हा जगातील पहिला शास्त्रज्ञ असतो', असे कलाम सर आपल्याला सांगतात.

आज आपण पाहतो, शाळेतील, महाविद्यालयांतील मुले परीक्षांत जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी धडपडत असतात. त्यामुळे ज्ञानाशी त्यांची योग्य ओळख होत नाही. आजकाल मोठ्या सुट्टीतही खास वर्गाचे अभ्यासक्रम पार पाडण्याच्या धडपडीतून जीवनव्यवहाराचे ज्ञान संपादन करून बहुश्रूत व्हावे कसे ? ही सर्व जीवघेणी धडपड पदव्या मिळविण्यासाठी असते. पण पदवी मिळाली म्हणजे नोकरीची शाश्वती असतेच असे नाही. अठरा-वीस वर्षे अव्याहतपणे क्रमिक अभ्यासक्रम पार पाडण्याच्या धडपडीतून जीवनव्यवहाराचे ज्ञान संपादन होत नाही आणि मग वाट्याला केवळ अपयश येते.

पण हे असे घडण्याचे मुख्य कारण आहे की, आजचे शिक्षण हे ज्ञान देणारे नव्हे, तर मार्कस् कमावणारे झाले आहे. प्रत्यक्ष जीवनाशी, व्यवहारातील कृतींशी या ज्ञानाचा संबंधच राहिलेला नाही. शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेला विद्यार्थी आत्मविश्वासाने व्यवहारात वावरू शकत नाही. तो बावरलेला असतो. त्यामुळे शिक्षणावरचा विद्यार्थ्यांचा वा समाजाचा विश्वास उडाला आहे. शिक्षणाविषयीचा आदर वा आस्था नष्ट झाली आहे. म्हणून परीक्षेत कॉपी करणे, पैसे घेऊन प्रश्नपत्रिका फोडणे, पैसे चारून पदव्या मिळवणे या भ्रष्टाचाराच्या भस्मासुराचा कोणालाही खेद वाटत नाही.

आता हल्लीचीच बाब घ्याना. तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी आठवीपर्यंत सर्व मुलांना उत्तीर्ण करायचे ठरवले होते. अशा शिक्षणपद्धतीने मुलांचे क्षणिक ओझे कमी होते. पण पुढचे काय? मुलांची अधोगती होते. आठवीपर्यंत सरसकट सगळ्यांना उत्तीर्णच करायचे ठरवले तर पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची अभ्यास करण्याची सवय मोडते आणि दुसरं म्हणजे पुढील वर्षी खूप ताण येतो. हुशार विद्यार्थी हे आधीच लक्षात घेऊन नेमाने त्याचा अभ्यास करतात. पण इतरांचे काय? मेहनत करण्यासाठी नेहमी तयार असलेल्या, मेहनतीच्या कष्टांच्या बळावर पुढे आलेल्या आणि येणाऱ्या मुलांवर हा अन्याय आहे. असो ! सुदैवाने हीतरी शिक्षणपद्धती आता नाही.

अब्राहम लिंकन यांनी म्हटले आहे की, शिक्षण म्हणजे माणसाच्या मनोबुद्धीला पूर्णता देण्यासाठी केलेली अखंड धडपड ! मग ही धडपड ज्ञानार्थी असायला नको का? फक्त चांगले मार्कस् कमावण्यासाठी शिक्षण घेऊ नये. त्यातून स्वतःला 'ज्ञानार्थी' बनवावे, व्यक्तिमत्त्वाला आकार द्यावा, स्वतःला घडवावे.

पण आजचे शिक्षण पूर्ण 'परीक्षार्थी' बनू पाहते आहे. ज्ञान, प्रज्ञा, चारित्र्य यांचा सगळीकडे खडखडाटच दिसतोय.

परीक्षा घेण्याचा हेतू काय? तर माणसाचं कर्तृत्व उजळून निघावं हा ! परंतु आजे असे दिसत नाही. परीक्षा हाच जर विद्वत्तेचा कस मानायचं ठरवलं तर न्यूटन, फॅरॅडे यांनी कोणत्या परीक्षा दिल्या होत्या ? संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, रामदास स्वामी हे कोणत्या विद्यापीठाचे पदवीधर होते. हे सर्व जीवनाच्या मुक्त विद्यापीठाचे पदवीधर होते!

(पृष्ठ क्र. ३३ वर)

# गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील ‘सुवर्णयुग’

**भाग : २**

*प्राचीन काळात इसवीसनाच्या ४ थ्या व ५ व्या शतकात भारतावर राज्य करणाऱ्या सुप्रसिद्ध ‘गुप्त’ घराण्याविषयी व त्यांच्या राज्यकारभाराविषयी विस्तृत माहिती देणारा लेख - संपादक*

(लेखाचा उर्वरीत भाग मागील अंकापासून पुढे...)

समुद्रगुप्ताच्या ह्या साम्राज्य विस्ताराच्या कामगिरीमुळे आपण त्याच्याबाबतीत निश्चितपणे म्हणू शकतो की, तो एक पराक्रमी राजा होता व उत्तम सेनापती तसेच योद्धा होता. त्यामुळेच समुद्रगुप्ताने लढलेल्या शंभर लढाया व त्यामुळे त्याच्या शरीरावर झालेले जखमांचे व्रण याचे हरिसेनाने केलेले वर्णन अतिशयोक्तियुक्त नसावे असा विश्वास वाटतो. त्याने गाजवलेल्या ह्या प्रचंड पराक्रमामुळेच समुद्रगुप्ताने ‘अश्वमेध यज्ञ’ केला होता असे म्हणणे देखील वावगे ठरू नये. समुद्रगुप्ताने फक्त रणांगणावर पराक्रम गाजवलेला नव्हता तर त्याने स्वतःला एक चांगला राजा व उत्तम प्रशासक म्हणून देखील सिद्ध केले होते. समुद्रगुप्ताला विद्वानांविषयी व कलाकारांविषयी आदर असल्याचे आपल्या निदर्शनास येते. एवढेच नव्हे तर, तो स्वतः एक श्रेष्ठ दर्जाचा कवी होता व विविध वाद्ये वाजविण्यात पारंगत होता. समुद्रगुप्ताच्या काही सोन्याच्या नाण्यांवर तो वीणा (भारतीय वाद्य) वाजविताना दाखविलेला आहे. समुद्रगुप्ताने प्रसिद्ध बौद्ध विद्वान वसुबंधू याला आपला मंत्री म्हणून नियुक्त केले होते असे इतिहासकारांचे मत आहे. समुद्रगुप्त हा श्रद्धाळू हिंदू राजा होता. त्याने ब्राह्मणांना हजारो गायी दान म्हणून दिल्याचे दाखले आपणास आढळतात. गुप्तांच्या काळात हिंदू धर्माचे पुनर्ज्जीवन झाले होते यात वाद नाही. मौर्यांच्या काळात, प्रामुख्याने अशोक सम्राट झाल्यानंतर बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला होता. त्यामुळे बौद्ध धर्माचा भारतात व भारताबाहेर देखील प्रसार होण्यास मोठी मदत झाली होती. परंतु गुप्त राजांच्या काळात पुन्हा एकदा हिंदू धर्माला राजाश्रय मिळाल्याचे निदर्शनास येते. गुप्त राजे स्वतः त्यांच्या जीवनात हिंदू धर्माचे पालन करत असत व त्यांनी अश्वमेध यज्ञासारख्या तसेच हिंदू पूजा-अर्चेच्या इतर अनेक पद्धतींचे पुनर्ज्जीवनीकरण केले होते यात वाद नाही.

समुद्रगुप्ताने ‘विक्रमांक’ असा किताब वा पदवी घेतलेली होती. तसेच त्याने मोठ्या प्रमाणात सोन्याची नाणी पाडली होती. यावरून त्याच्या काळात सुबत्ता व समृद्धी होती असे म्हटले जाते. त्याच्या काही नाण्यांवर त्याला सैनिकी पोशाखात दाखविलेले आहे. एका नाण्यावर समुद्रगुप्ताला हातात धनुष्य व बाण धरलेल्या अवस्थेत दाखविलेले आहे. दुसऱ्या एका नाण्यावर तो लढायांत वापरली जाणारी कुऱ्हाड घेऊन असलेला, तर अजून एका नाण्यावर तो बाणाच्या सहाय्याने वाघाची शिकार करत आहे असे दाखविण्यात आले आहे. एका नाण्यावर समुद्रगुप्त अश्वमेध यज्ञ करत असल्याचे दाखविले आहे. त्याच्या नाण्यांवरील प्रतिमेवरून समुद्रगुप्त हा सशक्त शरीरयष्टी असलेला व उंचापुरा राजा होता असे म्हटले जाते. अशाप्रकारे समुद्रगुप्ताच्या काळात कला व साहित्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली होती व सर्वत्र सुबत्ता व समृद्धी होती असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळेच गुप्तांच्या काळास प्राचीन भारतातील ‘सुवर्णयुग’ असे म्हटले जाते. समुद्रगुप्ताने प्रदीर्घ काळ राज्य केले असे इतिहासकार म्हणतात. प्राचीन भारतातील हा महान राजा इसवीसन ३८० व्या आसपास मृत्यू पावला असे अभ्यासकांचे मत आहे.

विशाखादत्त लिखित ‘देवी चंद्रगुप्तम्’ ह्या संस्कृत नाटकाच्या आधारे काही इतिहासकार असे मानतात

की, समुद्रगुप्तानंतर रामगुप्त हा गुप्त सम्राट बनला. हे नाटक आपणास सध्या पूर्णतः मूळ स्वरूपात सापडत नाही, परंतु इतर साहित्यकृती व पुस्तकांमध्ये तसेच ग्रंथांमध्ये 'देवी चंद्रगुप्तम्' ह्या नाटकातील काही उतारे उद्धृत करण्यात आले आहेत. अशा उताऱ्यांचे वाचन करून अभ्यासकांनी निष्कर्ष काढला आहे की, समुद्रगुप्तानंतर रामगुप्त हा राजा बनला. परंतु त्याच्या कारकीर्दीत वाखाणण्याजोग्या गोष्टी तर झाल्या नाहीतच मात्र गुप्त राजघराण्याला लाजवणाऱ्या काही घटना घडल्या. त्यामुळे रामगुप्ताचा उल्लेख गुप्तांच्या वंशावळीतसुद्धा केलेला नाही असे आपल्या निदर्शनास येते. 'देवी चंद्रगुप्तम्' मध्ये दिलेली गुप्त घराण्याच्या दृष्टीने लाजिरवाणी जी घटना रामगुप्तच्या काळात घडली असे काही इतिहासकार मानतात ती घटना पुढीलप्रमाणे आहे – उत्तर भारतात गुप्त साम्राज्याच्या पश्चिमेस शक सत्रपांचे /क्षत्रपांचे (Kshatrapas) राज्य होते. समुद्रगुप्ताच्या काळात ह्या शकांनी गुप्त घराण्याचे वा सम्राटांचे मांडलिकत्व पत्करले होते. परंतु समुद्रगुप्तानंतर जेव्हा रामगुप्त सत्तेवर आला तेव्हा शक व गुप्तांमध्ये संघर्ष झाला. त्यावेळी तत्कालीन शक राजाने रामगुप्तला बंदी बनविले व त्याला त्याच्या प्रजेची सुरक्षा हवी असेल तर त्याने त्याची (रामगुप्तची) राणी ध्रुवराणी हिला शक राजाकडे पाठवून द्यावे असे सांगितले. विशाखादत्तच्या नाटकानुसार रामगुप्ताने आपल्या प्रजेचे शकांपासून रक्षण करण्याकरिता ही मानहानीकारक अट मान्य केली. परंतु समुद्रगुप्तचा दुसरा पुत्र व रामगुप्तचा भाऊ दुसरा चंद्रगुप्त ह्याला ध्रुवदेवीला शक राजाकडे पाठवून देण्याची अपमानकारक अट मान्य करणे रुचले नाही. त्यामुळे दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वतः राणीसारखी (ध्रुवदेवी सारखी) वेशभूषा केली व तो शक राजाकडे गेला व त्याने शक राजाचा खून वा हत्त्या केली. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या ह्या धाडसी कृत्यामुळे अर्थातच त्याची जनतेमध्ये लोकप्रियता वाढली. विशाखादत्तने ह्या नाटकात पुढे असे म्हटले आहे की, दुसऱ्या चंद्रगुप्ताने कालांतराने आपला मोठा बंधू रामगुप्त ह्याचीदेखील हत्या केली व तो स्वतः गुप्त सम्राट बनला.

विशाखादत्त कृत 'देवी चंद्रगुप्तम्' ह्या नाटकात आलेली वरील कथा आर. सी. मुजुमदार यांच्यासारख्या प्रसिद्ध इतिहासकाराला मान्य नाही. त्यांनी विशाखा दत्तच्या ह्या नाटकातील ऐतिहासिकतेबाबत व खरेपणाबाबत शंका उपस्थित केली आहे. आर. सी. मुजुमदारांच्या म्हणण्यानुसार समुद्रगुप्तानंतर लगेचच शकांनी गुप्तांना रणांगणावर शह देऊन त्यांची मानहानी करावी हे पटत नाही. तसेच मोठ्या भावाचा खून करून त्याच्या पत्नीशी विवाह करणे असे अनैतिक वर्तन दुसऱ्या चंद्रगुप्तासारखा राजपुत्र करू शकेल ह्यावरसुद्धा विश्वास ठेवणे कठीण आहे असे मुजुमदारांचे मत आहे. सिल्व्हेन लेवी (Sylvain Levi) ह्या फ्रेंच अभ्यासकाच्या मते देखील नंतरच्या काळात लिहिल्या गेलेल्या 'देवी चंद्रगुप्तम्' सारख्या नाटकांमध्ये दिलेल्या घटनांना आपण ऐतिहासिकदृष्ट्या विश्वासार्ह व खऱ्या आहेत असे मानणे अयोग्य आहे.

समुद्रगुप्ताला अनेक पुत्र व नातवंड होती असे काही इतिहासकार म्हणत असले तरी, आपणास त्याला त्याची पट्टराणी दत्तदेवी हिच्यापासून झालेल्या दुसरा चंद्रगुप्त ह्या राजपुत्राविषयी खात्रीलायक माहिती मिळते. दुसरा चंद्रगुप्त हा देवगुप्त, देवराज व देवश्री ह्या नावांनीदेखील ओळखला जात असे. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या ध्रुवदेवी व कुवेरनाग ह्या दोन राण्या अभ्यासकांना ज्ञात आहेत. दुसरा चंद्रगुप्त 'परम भागवत' म्हणून देखील ओळखला जाई. यावरून असे सिद्ध होते की, तो परम विष्णूभक्त होता. बहुसंख्य इतिहासकारांचे असे मत आहे की, दुसरा चंद्रगुप्त इसवीसन ३७६ मध्ये राजा बनला असावा व त्याचा मृत्यू इसवीसन ४१३ ते ४१५ च्या दरम्यान झाला असावा. दुसरा चंद्रगुप्त आपल्या पित्याप्रमाणेच म्हणजेच समुद्रगुप्ताप्रमाणे महान योद्धा व सेनापती होता. त्याने गुप्तांच्या साम्राज्याच्या पश्चिमेला असलेल्या शकांच्या राज्यावर हल्ला केलेले दाखले

आपणास आढळतात. दुसऱ्या चंद्रगुप्ताने सद्याचा गुजराथ व सौराष्ट्रचा (काठियावाड) भाग शक राजांचा पराभव करून जिंकून घेतला होता. अशातऱ्हेने गुप्तांच्या साम्राज्याचा पश्चिमेकडे अरबी समुद्रापर्यंत विस्तार करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी दुसऱ्या चंद्रगुप्ताने पार पाडलेली आपल्या लक्षात येते. दुसऱ्या चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' ही पदवी घेतली होती वा धारण केली होती असे अनेक इतिहासकारांचे म्हणणे आहे. एवढेच नव्हे तर प्राचीन काळातील सुप्रसिद्ध संस्कृत विद्वान व लेखक-कवी कालीदास हा विक्रमादित्याच्या म्हणजेच दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या दरबारातील एक 'रत्न' होता असे म्हटले जाते. यावरून असे लक्षात येते की, दुसरा चंद्रगुप्त आपल्या पित्याप्रमाणे फक्त धाडसी व शूर योद्धाच नव्हता तर तो समुद्रगुप्ताप्रमाणे विद्वत्तेला मान व बहुमान देऊन विद्वान लेखक-कवी व कलावंतांचे कौतुक करून त्यांना राजाश्रय देणारा एक उमद्या मनाचा चांगला राजा होता. असे म्हटले जाते की, दुसऱ्या चंद्रगुप्ताचा सेनापती आम्रकारदेव (Amrkardeva) याने अनेक लढायांमध्ये विजयश्री प्राप्त केली होती. काही इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, दिल्लीत कुतुबमिनार जवळ चंद्र नावाच्या राजाचा एका लोखंडी स्तभांवर जो लेख कोरलेला आहे तो चंद्र राजा म्हणजेच दुसरा चंद्रगुप्त होय. अभ्यासक म्हणतात की, आपण ही गोष्ट मान्य केली तर असे स्पष्ट होते की, दुसऱ्या चंद्रगुप्ताने भारताच्या पूर्व तसेच पश्चिम अशा दोन्ही दिशांना पराक्रम गाजवला होता. दुसऱ्या चंद्रगुप्ताने 'वाहलीक' प्रदेशदेखील जिंकला होता असे इतिहासकार मानतात. काही अभ्यासकांचे असे म्हणणे आहे की, हा प्रदेश म्हणजे मध्य आशियातील 'बॅक्ट्रीया' हा प्रदेश होय. ह्यावरून दुसऱ्या चंद्रगुप्ताने त्याकाळात वायव्य भारतात (सध्याचा आग्नेय व पूर्व अफगाणिस्तान) कुशाण राजांचा पराभव केला होता असे निदर्शनास येते. दुसऱ्या चंद्रगुप्ताने ज्या शक राजाचा पराभव करून खातमा केला होता त्याचे नाव सिंहसेन असे होते असे मत व्यक्त केले जाते. असे म्हटले जाते की, पश्चिम भारतातील शक क्षत्रपांचा (राजांचा) नाश करण्याची प्रक्रिया दीर्घकालीन असावी व शकांचा पूर्णपणे पराभव करण्यासाठी दुसऱ्या चंद्रगुप्ताला निदान वीस वर्षांचा कालावधी तरी लागला असावा.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्याने आपला पिता समुद्रगुप्ताप्रमाणे मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची नाणी पाडलेली होती. दुसऱ्या चंद्रगुप्ताला त्याने पाडलेल्या नाण्यांवर धनुर्धराप्रमाणे बाण व धनुष्य हातात घेतलेल्या अवस्थेत, आसनावर बसलेल्या अवस्थेत, सिंहाची शिकार करत असताना, इत्यादी अवस्थांमध्ये दाखविण्यात आले आहे. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काही नाण्यांवर 'देवश्री महाराजाधिराज श्री चंद्रगुप्त' असे वाक्य कोरलेले आढळते. अर्थात, ही दुसऱ्या चंद्रगुप्ताची पदवी असावी यात वाद नाही. काही नाण्यांवर गरुड (विष्णूचे चिन्ह /वाहन) व लक्ष्मीचे चित्र कोरलेले आढळते. यावरून पुन्हा एकदा हा मुद्दा सिद्ध होतो की, दुसरा चंद्रगुप्त हा परम विष्णू भक्त होता व त्यामुळेच त्याला 'परम भागवत' असे देखील म्हटले जाई. सिंहाची शिकार करतानाचे चित्र कोरलेले असलेल्या नाण्यावर दुसऱ्या चंद्रगुप्ताचे वर्णन 'सिंहविक्रम' असे केलेले आहे. दुसऱ्या चंद्रगुप्ताने चांदी तसेच तांब्याची देखील नाणी पाडलेली होती.

एकंदरीतच गुप्तांचे युग व प्रामुख्याने समुद्रगुप्त व दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीविषयीची माहिती आपणास विविध इतिहासकारांनी लिहिलेल्या ग्रंथांमधून व शोध निबंधांमधून मिळते. गुप्त काळाच्या इतिहासाबाबत लिखाण करणाऱ्या इतिहासकारांमध्ये आपणास आर. सी. मुजुमदार, डॉ. एच्. सी. चौधरी, डॉ. व्ही. ए. स्मिथ, डॉ. आर. जी. भंडारकर, डॉ. ए. एस्. आळतेकर, डॉ. राधाकुमूद मुकर्जी आदी इतिहासकारांचा तसेच इतिहासाचे व प्रामुख्याने भारतीय इतिहासाचे गाढे अभ्यासक व लेखक सर्वश्री व्ही. डी. महाजन यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ह्या व इतर अनेक

शहाणा माणूस जेव्हा एकटा असतो, तेव्हा तो खरा एकटा नसतो! - स्विफ्ट

विद्वान मंडळींनी विविध शिलालेख, स्तंभलेख तसेच तत्कालीन साहित्यिक साधने (प्रामुख्याने संस्कृत पंडित, कवी, लेखक तसेच बौद्ध भिक्कूंचे व चीनी प्रवाशांनी /भिक्कूंनी लिहिलेले विविध ग्रंथ) यांचा कसोशीने अभ्यास करून आपणास गुप्त कालाविषयी अभ्यासपूर्ण व चिकित्सक माहिती देण्याचे महत् कार्य केले आहे.

दुसऱ्या चंद्रगुप्ताचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे हा राजा विविध नावांनी प्रसिद्ध आहे. दुसऱ्या चंद्रगुप्ताची काही प्रसिद्ध नावे पुढीलप्रमाणे आहेत – विक्रमादित्य, नरेंद्रचंद्र, सिंहचंद्र, नरेंद्रसिंह, सिंहविक्रम, देवराज, देवगुप्त व देवश्री. अगोदर नमूद केल्याप्रमाणे त्याच्या पित्याचे नाव समुद्रगुप्त तर आईचे नाव दत्तदेवी होते. त्याच्या ध्रुवदेवी व कुबेरनाग ह्या दोन राण्या होत्या व कुमारगुप्त व गोविंदगुप्त हे दोन पुत्र होते. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कन्येचे नाव प्रभावतीगुप्ता होते. प्रभावतीगुप्ताचा विवाह दख्खनवर (यात महाराष्ट्राचा समावेश होतो) राज्य करणाऱ्या वकाटक या राजघराण्यात झालेला होता. वकाटक हे राजघराणे देखील त्याकाळात गुप्त राजघराण्याप्रमाणेच एक प्रबळ व नावाजलेले राजघराणे होते. प्रभावतीगुप्ता ही दुसऱ्या चंद्रगुप्तज्ञला त्याची नाग राजघराण्यातील राणी कुवेरनाग हिच्यापासून झालेली राजकन्या होती. प्रभावतीगुप्ताचा ज्या वकाटक राजासोबत विवाह झाला होता त्याचे नाव दुसरा रुद्रसेन असे होते. दुर्दैवाने ह्या दुसऱ्या रुद्रसेनाची कारकीर्द अल्प ठरली व त्याच्या मृत्यूनंतर वकाटकांच्या राज्याचा कारभार प्रभावतीगुप्ताने आपल्या दिवकरसेन व दुसरा प्रवरसेन या दोन अल्पवयीन राजपुत्रांच्यावतीने स्वतः अनेक वर्षे चालविला होता असे इतिहासकार म्हणतात. प्रभावतीगुप्ताने इसवीसन ३९० ते ४१० या कालावधीत म्हणजेच जवळ जवळ वीस वर्षे वकाटकांचा राज्यकारभार चालवला होता असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्याकाळात कुंतल प्रदेशावर (पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग व उत्तर म्हैसूरचा भाग) राज्य करणाऱ्या कदंब राजघराण्यातील काकूत्स्थवर्मन ह्या राजाने आपल्या राजकन्यांचा विवाह गुप्त राजघराण्यातील व्यक्तींसोबत लावून दिला होता अशी माहिती आपणास काही शिलालेखांवरून मिळते. तसेच विक्रमादित्याने (अर्थात, हा राजा म्हणजे दुसरा चंद्रगुप्तच असावा) कुंतल देशात आपले राजकीय प्रतिनिधी पाठविले होते अशा आशयाची माहितीसुद्धा आपणास मिळते.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातदेखील पाटलीपुत्र हे शहरच गुप्त साम्राज्याची राजधानी होती असे अभ्यासक मानतात. परंतु दुसऱ्या चंद्रगुप्ताने प्रदीर्घ काळ माळव्यातील (पश्चिम मध्यप्रदेश) विदिशा व उज्जैन (उज्जयनी) ह्या शहरांमध्ये निवास केला असावा असे इतिहासकार मानतात. याचे कारण म्हणजे दुसऱ्या चंद्रगुप्ताचा उल्लेख उज्जैनचा स्वामी असादेखील आलेला आहे. दुसऱ्या चंद्रगुप्ताला शक क्षत्रपांचा पराभव करण्यासाठी त्याच्या साम्राज्याच्या पश्चिम भागात येणे आवश्यक होते व आपण अगोदर पाहिलेलेच आहे की, शकांचा पराभव करण्याची प्रक्रिया निदान वीस वर्षे तरी चालली असावी असे इतिहासकारांचे मत आहे. त्यामुळे दुसऱ्या चंद्रगुप्ताला उज्जैनसारख्या पश्चिमेकडील शहरात बराच काळ निवास करणे क्रमप्राप्त ठरले असावे. त्याचप्रमाणे गुप्तांच्या साम्राज्याचा विस्तार एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेला होता की, दुसऱ्या चंद्रगुप्तासारख्या सम्राटांना त्यांच्या साम्राज्याच्या विविध भागात असलेल्या प्रमुख शहरांमध्ये निदान काही काळतरी निवास करणे क्रमप्राप्त असावे. असे म्हणण्याचे कारण असे की, आपणास काही साधनांमध्ये गुप्तांची राजधानी अयोध्या हे शहर होते असेदेखील संदर्भ आढळतात. तसेच अयोध्येच्या परिसरातदेखील दुसऱ्या चंद्रगुप्ताने पाडलेली तांब्याची नाणी मोठ्या प्रमाणात सापडल्यामुळे ह्या मतास पुष्टी मिळते. दुसऱ्या चंद्रगुप्ताचा पुत्र गोविंदगुप्त हा तिरभुक्ती म्हणजेच मिथिला (आधुनिक बिहार) ह्या प्रांताचा प्रांताधिकारी होता अशी माहितीदेखील आपणास मिळते. आपणास, गुप्तांच्या प्रांतीय पातळीवरील प्रमुख अधिकाऱ्यांची नावे कुठली होती ही माहितीसुद्धा मिळते.

---

एकांतवासाचा काही लोकांवर मद्यासारखा परिणाम होतो. त्यांनी तो अति होऊ देता कामा नये;
नाहीतर तो थेट डोक्यात चढेल. – मेरी कॉलेरिज

ही नावे वा त्यांची पदनामे तसेच काही महत्त्वाची कार्यालये पुढीलप्रमाणे आहेत – कुमारमात्यधिकरण, बलाधिकर्ण, रणबांदाधिकर्ण, दंडपाशधिकर्ण, महाप्रतिभार, महादंडनायक, विनयस्थिती–स्थापक, भटाश्वपती, उपरिक इत्यादी. ह्यापैकी कुमारमात्यधिकरण म्हणजे प्रांताधिकाऱ्याच्या (जो सहसा राजपुत्रच असे) विविध मंत्र्यांच्या कार्यालयांचे एकत्रित नाव होते व ह्या सर्वांचा प्रमुख कुमारअमात्य असे. कुमारअमात्य म्हणजेच प्रांताधिकाऱ्यांच्या मंत्र्यांच्या प्रमुखाचा काही ठिकाणी 'भत्तारक' तसेच 'युवराज' असादेखील उल्लेख आलेला आढळतो. बलाधिकर्ण हा मंत्री प्रांताधिकाऱ्याच्या सैन्याचा प्रमुख असे. बलाधिकर्ण ह्या मंत्र्याचा उल्लेखदेखील काही ठिकाणी 'युवराज' व 'भत्तारक' असा आलेला आहे. रणबांदाधिकर्ण हा मंत्री सैन्यावर होणाऱ्या खर्चाचा हिशोब ठेवणाऱ्या खजिन्याचा मंत्री असे. दंडपाशधिकर्ण हा पोलीस खात्याचा प्रमुख असे. महाप्रतिभार हा प्रांताधिकाऱ्याच्या भटारखान्याचा प्रमुख असे तर महादंडनायक मुख्य न्यायाधिशाचे काम करत असे. विनयस्थिती–स्थापकाकडे कायदा सुव्यवस्थेच्या खात्याची जबाबदारी असे. भटाश्वपती हा पायदळ व घोडदळाचा प्रमुख असे. खुद्द प्रांताधिकाऱ्यास 'उपरिक' असे म्हटले जात असे. आपणास विक्रमादित्य दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या आमरकारदद्व, साब विरसेन, शिखरस्वामी इत्यादी मंत्र्यांचा उल्लेख काही साधनांमध्ये आलेला आढळतो. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात व्यापार उदीमाची मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली निदर्शनास येते. त्याकाळात गुप्तांच्या साम्राज्यात व्यापारी (सारथवाह), पैश्याचा पुरवठा/पत पुरवठा करणारे शेठ (श्रेष्ठी) तसेच कलाकुसरीचे काम करणारे व विविध वस्तूंचे निर्माण करणारे कुशल कलावंत (कुलीक) यांची संख्या विविध शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात होती असे दाखले आढळतात. अर्थकारण व आर्थिक व्यवहारात गुंतलेल्या ह्या सगळ्या महत्त्वाच्या लोकांचे स्वतःचे एक संघटनदेखील असे.

गुप्तांच्या साम्राज्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या साम्राज्यात सर्व धर्मांना समान वागणूक वा दर्जा दिला जात असे. ह्याचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे समुद्रगुप्ताचा वीरसेन हा मंत्री धर्माने बौद्ध होता. गुप्त सम्राट स्वतः मात्र त्यांच्या खाजगी जीवनात हिंदू धर्माचे पालन करत असत. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातदेखील हेच धार्मिक धोरण अस्तित्वात होते. दुसरा चंद्रगुप्त स्वतः हिंदू धर्माच्या वैष्णव पंथाचे पालन करीत असे. त्यामुळेच त्याच्या नाण्यावर विष्णूचे वाहन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गरुड ह्या पक्षाचे चित्र आढळून येते. तसेच त्याचा उल्लेख 'परम भागवत' असा देखील करण्यात आलेला आहे. दुसरा चंद्रगुप्त स्वतः जरी वैष्णव असला तरी त्याच्या काळात हिंदूधर्माच्या 'शैव' पंथियांना व बौद्ध धर्मियांना त्यांच्या पद्धतीने धर्मोपासना करण्याचे स्वातंत्र्य होते. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या एका महत्त्वाच्या मंत्र्याने सांची येथील बौद्ध विहाराला एक गाव वा जमीन इनाम म्हणून दिल्याचे पुरावे आपणास सापडतात. स्वतः राजा सर्वधर्मसमभाव ह्या तत्त्वात विश्वास ठेवणारा असल्याखेरीज त्याचा एखादा मंत्री परधर्मियांना एक गाव इनाम देणे शक्य नाही यात वाद नाही. तसेच दुसऱ्या चंद्रगुप्ताचा अजून एक महत्त्वाचा मंत्री शैवपंथीय होता अशी माहिती आपणास उदयगिरी येथील गुहांमध्ये सापडलेल्या शिलालेखावरून मिळते व त्याने उदयगिरी येथील गुहांमध्ये शिलालेख कोरून घेतला होता अशी माहिती आपणास मिळते. इसवीसन ३८० मध्ये कोरलेल्या मथुरेतील स्तंभलेखावरून आपणास अशी माहिती मिळते की, त्या परिसरात उदीताचार्य ह्या व्यक्तिच्या प्रयत्नांमुळे 'महेश्वर' नामक शैवपंथाचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत होता. भागवत कुशीक हा 'महेश्वर' शैव पंथाचा संस्थापक होता अशी देखील माहिती आपल्याला मिळते. ह्या कुशिकाचा उल्लेख 'वायुपुराण' व 'लिंगपुराणात' शिव महेश्वराचा शेवटचा अवतार 'लाकुली'चा पहिला शिष्य असा आलेला आहे असे अभ्यासकांचे मत आहे. लाकुलीचे

भेकडाची पत्नी होण्यापेक्षा सैनिकाची पत्नी होणे बरे. – टी. बी अलड्रीच

चार शिष्य होते व त्यांनी पाशुपत पंथाची (शैव पंथाचा अजून एक उपपंथ म्हणता येईल) स्थापना केली असे म्हटले जाते. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात शैव पंथीय शिवलिंगाची पूजा करीत असत असे दाखले देखील आपणास सापडतात. तसेच त्याकाळात मोठ्या प्रमाणात वा संख्येने बौद्ध विहार होते यात वाद नाही.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात फा-हियान (Fa-Hien) हा चिनी प्रवासी भारतात येऊन गेला होता. फा-हियान (इसवीसन ३९९ ते ४११) हा भारतात खुष्कीच्या (भूमार्ग) मार्गाने आला होता तर तो मायदेशी म्हणजेच चीनला जलमार्गाने (समुद्र-सागरी मार्गाने) परतला होता. असे म्हटले जाते की, फा-हियानची सहा वर्षे प्रवासात गेली तर त्याने सहा वर्षे भारतात बौद्ध धर्म व त्या धर्माशी निगडित साहित्याचा अभ्यास करण्यात व्यतीत केली. त्याचा प्रवास एकंदरीत तीस देशांमधून झाला होता अशी माहिती आपणास मिळते. त्याने भारतातील जवळ जवळ तीन वर्षे संस्कृत भाषा लिहिता व बोलता यावी यासाठी व येथील धार्मिक साहित्याच्या हस्तलिखितात आवृत्त्या लिहून काढण्यासाठी घालवली होती. फा-हियान चीनला परतत असताना सिलोनमार्गे (सध्याचा श्रीलंका) गेला होता व तेथे त्याने दोन वर्षे वास्तव्य केले होते व तेथून पुढे तो सागरी मार्गाने जावा (सध्याच्या आग्नेय आशियातील इंडोनेशियाचा एक भाग) येथे गेला व तेथून पुढे सागरी मार्गानेच चीनला परतला असे दाखले आपणास सापडतात. भारतात तो अफगाणिस्तान, पेशावर, तक्षशीला, पंजाब, मथुरा, श्रवस्ती, लुबीणी, वैशाली, नालंदा, गया, बैद्धगया, राजगृह, पाटलीपुत्र इत्यादी ठिकाणी गेला होता. फा-हियान भारतात चीनच्या वायव्य प्रांतातून मध्य आशियाच्या मार्गाने आला होता. त्याने ह्या विविध ठिकाणी हिनयान व महायान ह्या बौद्ध धर्माच्या दोन्ही पंथांचे अनेक भिक्कू व उपासक तसेच बरेच बौद्ध विहार पाहिल्याचे नमूद केले आहे.

फा-हियान म्हणतो की, 'त्याकाळातील म्हणजेच दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील शासन व्यवस्था फार उदारमतवादी, लोकाभिमुख व कार्यक्षम होती.' तो पुढे असे देखील नमूद करतो की, त्याकाळात उत्तर भारतातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते व सामान्य लोक आनंदी जीवन व्यतीत करत. जे लोक राजाच्या मालकीच्या असलेल्या जमीनीवर शेती पिकवत असत ते लोक आपल्या अन्नधान्याच्या उत्पादनाचा काही भाग राजाला देत असत. गुन्हेगारांकडून बऱ्याच वेळा मोठ्या प्रमाणात दंड वसूल केला जात असे व बरेच लोक मद्यपान करत नसत अशी माहिती आपणास फा-हियान देतो. त्याचप्रमाणे समाजातील मोठा वर्ग कांदा व लसूण खात नसत अशी माहिती आपणास मिळते. राजाचे अंगरक्षक व खाजगी सेवकांना वेतन दिले जात असे. फा-हियान असेदेखील नमूद करतो की, समाजात चांडाळांचा देखील वर्ग होता व ह्या वर्गाला अस्पृश्य गणले जात असे. चांडाळ व्यक्तीने गावात, शहरात वा बाजारात प्रवेश करताना लाकडाचा आवाज करून तो येत असल्याची सूचना सवर्णांना देणे क्रमप्राप्त होते, जेणेकरून त्याच्या मार्गातून सवर्ण बाजूला होतील व त्याचा स्पर्श होणे त्यांना टाळता येईल. यावरून असे सिद्ध होते की, गुप्त काळात समाजात अस्पृश्यतेसारखी समस्या अस्तित्वात होती. राजा देवालये उभारण्यासाठी सढळ हस्ते मदत करत असे व राजाच्या महसूलाचा महत्त्वाचा स्रोत राजाच्या मालकीच्या जमीनीवरून गोळा होणारा शेतसारा होता अशी माहिती फा-हियान आपणास देतो. एवढेच नव्हे तर, दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात राजाच्या अधिकाऱ्यांना कामाचा मोबदला म्हणून वेतन देण्याची आधुनिक वा चांगली पद्धत अस्तित्वात होती ही माहितीसुद्धा आपणास फा-हियानच्या लिखाणाच्या माध्यमातून मिळते. नंतरच्या काळात व प्रामुख्याने मध्ययुगीन काळात भारतात मुस्लीम राजवट प्रस्थापित झाल्यावर अधिकाऱ्यांना, सुभेदारांना व सैनिकांना जहागिरी देण्याची चुकीची पद्धत सुरू झाली होती. ह्या

मनुष्य हा माणूस म्हणून जितका वाईट, तितका सैनिक म्हणून चांगला. - नेपोलिअन

जहागिरदारीची खिरापत वाटण्याच्या पद्धतीमुळे राज्यातील जहागिरदार स्वतःच राजा असल्याच्या आविर्भावात वागत व वेळप्रसंगी राजाविरुद्ध बंड करत असत. त्यामुळेच दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात म्हणजेच आजपासून जवळ जवळ सोळाशे वर्षांपूर्वी अधिकाऱ्यांना जहागिरी न देता वेतन देण्याची पद्धत अस्तित्वात होती याचे कौतुक वाटते व दुसरा चंद्रगुप्त हा दूरदृष्टी असलेला राजा व उत्तम प्रशासक होता ही बाब अधोरेखीत होते. फा-हियान आपणास सांगतो की, 'लोक प्रवाशांच्या, यात्रेकरूंच्या व साधू तसेच भिक्कूंच्या निवासाची तसेच खाण्या-पिण्याची सोय व्हावी यासाठी धर्मशाळा बांधत.' तसेच सरीपुत्त, मोग्गलन व आनंद (हे गौतम बुद्धाचे शिष्य होते) यांच्या सन्मानार्थ पॅगोडा बांधलेल्याची माहिती आपणास मिळते. फा-हियानने गुप्तांची राजधानी पाटलीपुत्र ह्या शहरासदेखील भेट दिली होती. पाटलीपुत्र हे शहर इसवीसनापूर्वीच्या चौथ्या ते दुसऱ्या शतकात प्राचीन भारतावर राज्य करणाऱ्या मौर्य राजघराण्याची वा सम्राटांचीदेखील राजधानी होती.

जगप्रसिद्ध मौर्य सम्राट अशोकाचा राजवाडा दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात अस्तित्वात होता व अशोकाचा हा राजवाडा आपण पाटलीपुत्र शहरात पाहिल्याचे फा-हियान नमूद करतो. ह्या राजवाड्यात अनेक मोठी दालने असल्याचे देखील सांगण्यास फा-हियान विसरत नाही.

फा-हियान सध्याच्या पूर्व उत्तर प्रदेश व बिहारमध्ये असलेल्या बौद्ध धर्माच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा अनेक ठिकाणांचे वर्णन करतो. तो म्हणतो की, बौद्धांचे पवित्र शहर 'गया' ला त्याने भेट दिली तेव्हा ते शहर जवळ जवळ मोकळे होते; म्हणजेच तेथे लोकांचा निवास नसल्यात जमा होता. तसेच 'बोधगया' ह्या बौद्ध पवित्र ठिकाणाच्या आसपास जंगल वाढलेले होते. एकेकाळच्या बौद्ध धर्मियांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या कपिलवस्तू व कुशीनगर ह्या ठिकाणी वस्ती करणाऱ्या लोकांची संख्या फारच तुरळक वा कमी असून तेथे प्रामुख्याने बौद्ध भिक्कूच श्रद्धेपोटी राहतात असे फा-हियान नमूद करतो.

फा-हियानने आपल्या लिखाणातून दिलेल्या माहितीच्या आधारे आपण निश्चितपणे असे म्हणू शकतो की, दुसरा चंद्रगुप्त हा स्वतः जरी हिंदू धर्माचा उपासक व वैष्णव पंथीय होता तरी त्याच्या काळात बौद्ध धर्मियांना सुद्धा चांगली वागणूक दिली जात होती. अन्यथा एवढ्या मोठ्या प्रमाणात वा संख्येत त्या काळात भारतात बौद्ध भिक्कू व बौद्ध विहार आढळले नसते.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या ऊर्फ विक्रमादित्याच्या कारकीर्दीचा अभ्यास व अवलोकन केल्यावर आपल्या लक्षात येते की, तो खरोखरच एक महान सम्राट होता. त्याने सर्वधर्मसमभावाचे तत्त्व अंगिकारून आपल्या पदरी वा दरबारात शैव व बौद्ध अधिकाऱ्यांचीसुद्धा नियुक्ती केली होती. तसेच तो एक कुशल प्रशासक व धाडसी योद्धा होता. त्याने आपला पिता समुद्रगुप्त याने साम्राज्य विस्ताराच्या रचलेल्या पायावर खऱ्या अर्थाने कळस रचला. त्याच्या काही नाण्यांवर सिंहाची शिकार करत असताना दाखविण्यात आले आहे. यावरून त्याच्या धाडसाची तसेच बळाची कल्पना येते. त्याने शकांचा (शक-स्कायथियन हे मूळचे इराण व इराणच्या उत्तरेकडील प्रदेशातील लोक होते) पराभव करून भारतातील परकीय शक्तींचे वा शत्रूंचे दमन केले होते. त्याच्या एकंदरीत कारकीर्दीचा व कामगिरींचा आढावा घेतल्यावर त्याने घेतलेली 'विक्रमादित्य' ही पदवी योग्यच होती असे म्हणावे लागेल.

(क्रमशः)

(टीप : हा लेख प्रदीर्घ असल्यामुळे तो क्रमशः छापला जाईल. ह्या लेखाचा भाग दुसरा छापत आहोत.)

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

# 'मानवी पुनरुत्थानवाद'

*या महिन्याच्या 'लिओनार्दो आणि त्याच्या कलाकृती' या संपादकीयात Renaissance Humanish (मानवी पुनरुत्थानवाद) या संकल्पनेचा उल्लेख केलेला आहे. त्या संकल्पनेवरील ही टीप. – संपादक*

'मानवी पुनरुत्थानवाद' हा अभिजात पुरातत्त्वाचा अभ्यास आहे. प्रथमतः तो इटालीत झाला आणि मग १४, १५ आणि १६ व्या शतकांत पश्चिम युरोपात पसरत गेला. मानवी पुनरुत्थानवाद हा वाक्यप्रयोग त्या काळाशी समकालीन आहे. पुढे अनेक विकासांना 'मानवतावाद' म्हणून एका गटात ओळखले जाऊ लागले त्यापासून हा निराळा ओळखला गेला पाहिजे.

'मानवी पुनरुत्थानवाद' हा 'उपयुक्ततावादा'च्या प्रतिक्रियास्वरूप निर्माण झाला, आणि मध्ययुगीन विद्वत्तेशी संबंधित 'संकुचित पांडित्या'चे प्रतीक मानला जाऊ लागला. मनुष्यहितवादी मग; वाक्पटूत्वाने आणि स्पष्टतेने बोलता व लिहिता येऊ शकणारे समर्थ नागरिक निर्माण करण्याचे ईप्सित बाळगू लागले. सद्गुणपूर्ण आणि विवेकी वर्तनासाठी ते इतरांना प्रवृत्त करू लागले, जेणे करून सभ्य नागरी जीवनास ते सक्षम होतील. व्याकरण, वक्तृत्व, इतिहास, काव्य आणि नैतिक तत्त्वज्ञानादी मानवीय कला विषयांच्या अभ्यासात ते प्रयास मग परिणत झाले.

त्या चळवळीतील एका विद्वानांनुसार, सुरुवातीचा इटालियन मानवतावाद, जो अनेक बाबतींत व्याकरणात्मक आणि वाक्पटुत्वात्मक मध्ययुगीन परंपराच चालवत होता, त्याने केवळ जुने प्राथमिक शिक्षण आणि 'मानवतेचा अभ्यास' हे अधिक नवीन व महत्त्वाकांक्षी नावही पुरवले नाही; तर शालेय व विद्यापीठीय प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष आवाका, मजकूर आणि महत्त्वही वाढवले. स्वतःची विस्तृत साहित्यनिर्मिती सुरू केली. त्यात तर्कशास्त्र समाविष्ट नव्हते. मात्र पारंपरिक व्याकरण व वक्तृत्वकलेसोबत इतिहास, ग्रीक (भाषा) आणि नैतिक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची त्यात भर घातली गेली. एवढेच नव्हे तर, कधीकाळी व्याकरण व वक्तृत्वाच्या क्रमातच येणाऱ्या व संपूर्ण गटातील सर्वात महत्त्वाच्या असलेल्या काव्याचाही अंतर्भाव केला गेला.

मानवी पुनरुत्थान हा काही थोड्या उच्चभ्रूंचा कार्यक्रम नव्हता, तर तो एक व्यापक सांस्कृतिक टप्पा होता. सांस्कृतिक वारसा, साहित्यिक वारसा आणि अभिजात पुरातत्त्वांतील नैतिक तत्त्वज्ञान पुनरुज्जीवित करणारा तो कार्यक्रम होता. मानवी पुनरुत्थानाची काही महत्त्वाची केंद्रे फ्लोरेन्स, नेपल्स, रोम, व्हेनिस, जिनिव्हा, मंटुआ, फेर्रारा आणि अर्बिनो ही होती.

## मूळ

सुरुवातीचे काही मानवी पुनरुत्थानवादी लोक, पेट्रार्क, जिओवन्नी बोक्कक्किओ, कोलुक्किओ सॅल्युटॅटी आणि पॅग्गिओ ब्रॅसिओलिनी इत्यादींच्या पुरातन संहितांचे संकलन करणारे थोर संग्राहक होते. ह्या चारांपैकी पेट्रार्क ह्यांना त्यांच्या ग्रीक व रोमन पवित्र ग्रंथांप्रतिच्या भक्तीपायी 'मानवतेचे जनक' संबोधले जाई. अनेक लोक कॅथॉलिक चर्चकरता काम करत. पेट्रार्कसारखे काही तर त्याच पवित्र परंपरेतील मानले जात. इतर काही वकील होते. काही इटालियन शहरातील विद्यापीठांचे कुलगुरू होते. त्यामुळे त्यांना ग्रंथाच्या प्रतिकरणाचा अधिकार प्राप्त असे. जसे की, पेट्रार्क ह्यांचे शिष्य आणि फ्लोरेन्सचे कुलगुरू सॅल्युटॅटी.

न मरतासुद्धा माणसाला सैनिक होता येईल आणि निःश्वास न टाकताही माणसाला प्रेमिक बनता येईल. – एड्विन अस्नॉन्ड

इटालीत मानवी पुनरुत्थानवादी शैक्षणिक कार्यक्रमास झपाट्याने स्वीकृती लाभली आणि १५ व्या शतकाच्या मध्यावर, उच्च वर्णियांतील अनेकांना मानवी पुनरुत्थानवादी शिक्षण लाभलेले होते. संभवतः पारंपरिक विद्याशाखांव्यतिरिक्त कॅथॉलिक चर्चचे काही सर्वोच्च अधिकारी मानवी पुनरुत्थानवादी होते. महत्त्वाच्या ग्रंथसंग्रहालयांप्रत त्यांची पोहोच होती. कार्डिनल बॅसिलिओस बेस्सरिअन हे त्यातीलच एक होते. ग्रीक परंपरेतून कॅथॉलिक चर्चमध्ये अंतरित झालेले. पोपच्या अधिकाराकरता त्यांचा विचार झाला होता. त्या काळातील ते एक सर्वात विद्वान गृहस्थ होते. १५ व्या व १६ व्या शतकांतील अनेक पोप मानवी पुनरुत्थानवादी होते. ज्यांपैकी एक, एॅईनिस सिल्व्हिअस पिक्कोलोमिनी (पोप पायस–२) सिद्धहस्त लेखक होते आणि त्यांनी ‘द एजुकेशन ऑफ बॉईज’ हा निबंध लिहिला होता. त्याचा विषयच मग 'मानवी पुनरुत्थान’ समजला जाऊ लागला. त्यामागची प्रेरणा मानवी पुनरुत्थानवादी समजली जाऊ लागली.

बायझंटाईन ग्रीक विद्वानांत आलेली स्थलांतरांची लाट आणि कॉन्स्टंटिनोपलचा क्रुसेडर्सनी केलेल्या पाडावापश्चातचे स्थलांतरित, व नंतर १४५३ मध्ये झालेल्या बायझंटाईन साम्राज्याच्या अंतामुळे ग्रीक आणि रोमन साहित्याच्या आणि विज्ञानाच्या पुनरुज्जीवनास मदत झाली. स्थलांतरितांना पुरातन भाषेची, कामांची माहिती होती. त्यांत गेमिस्टस प्लेथो, जॉर्ज ऑफ ट्रेबिझोंड, थिओडोरस गाझा आणि जॉन अर्गायरोपॉलस ह्यांचा समावेश होता.

इटालियन मानवी पुनरुत्थानवाद मग फ्रान्स, जर्मनी, निम्नस्तरीय देश आणि इंग्लंडमध्ये पसरला. १५०१ पूर्वीचा ग्रंथमुद्रणकाळ संपून मोठ्या प्रमाणातील मुद्रणाचा काळ आलेला होता आणि प्रोटेस्टंट सुधारणांशी जोडला जाऊ लागला होता. फ्रान्समध्ये, प्रख्यात पुनरुत्थानवादी गिल्लौम बुडे (१४६७ ते १५४०) ह्यांनी इटालियन मानवतावादाच्या भाषाशास्त्रीय पद्धती, पुरातत्त्वाच्या आणि अधिकृत इतिहासाच्या अभ्यासाकरता वापरल्या. जस्टिनिअन कायद्यावरचे तपशीलवार भाष्य लिहिले. बुडे, सुरुवातीच्या प्रजासत्ताकवादी इटालियन उमानिस्तीप्रमाणे नव्हते. ते शाही, निखळ तत्त्ववादी होते. नागरी आयुष्यात सक्रिय होते. फ्रँकोईस–१ करता मुत्सद्देगिरी करत होते. ‘कॉलेज देस लेक्चरस रॉयक्स’ च्या स्थापनेत त्यांनी हातभार लावलेला होता. दरम्यान, मार्गारिट दे नवर्रे, फ्रँकोईस–१ ह्यांची बहीण, कवियत्री, कादंबरीकार आणि धार्मिक गूढलेखक होत्या. त्यांनी त्यांचेपाशी स्वदेशी कवी आणि लेखकांचे वर्तुळ सांभाळलेले होते. ज्यात क्लेमेंट मॅरोट, पिअरे दे रॉन्सार्ड आणि फ्रँकोईस रॅबेलाईस ह्यांचा समावेश होत होता. (विकीपिडियाच्या सौजन्याने)

**– नरेंद्र गोळे**

●●●

---

(पृष्ठ क्र. २४ वरून – **आजचे शिक्षण : ज्ञान देणारे की मार्कस् कमावणारे?**)

ही शिक्षणाची स्थिती बदलावी असेच मलाही वाटते. परीक्षांच्या कारखान्यातून मी सुद्धा जात आहे. म्हणून वाटते की, शिक्षण व्यावहारिकदृष्ट्या घेतले पाहिजे. शिक्षण घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीशी सामना करावा लागला, की विद्यार्थी ज्ञानाकडे गंभीरपणे बघू लागतील. सचोटीने ज्ञान प्राप्त करू लागतील. साहजिकच ज्ञानाचा दर्जा उंचावेल; ‘ज्ञान तेथे मान’ या सुविचाराचा खरा अर्थ आजही घेतला जाईल आणि विद्यार्थीही ज्ञानार्थी बनेल.

**– गौरी अंबाजी परब**
प्रथम वर्ष – बी.एम्.एम्.
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

➢ मराठी विज्ञान परिषद आणि सांस्कृतिक कार्यसंचालनालय महाराष्ट्र शासन आयोजित राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी दि. १० नोव्हेंबर २०१७ रोजी दादर येथे पार पडली. या एकांकिका स्पर्धेत आपल्या शाळेतील इ.८वीच्या विद्यार्थ्यांनी 'मेरी आवाज सुनो' ही एकांकिका सादर केली. ठाणे, मुंबई विभागातून सादर झालेल्या एकूण ८ एकांकिकांमधून दुसऱ्या क्रमांकाने एकांकिकेची निवड झाली.

➢ दि. १४ नोव्हेंबर २०१७ रोजी 'बालदिना' निमित्त विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

➢ दि. ३ नोव्हेंबर २०१७ रोजी 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया' ठाणे यांचेतर्फे 'भ्रष्टाचार मुक्त भारत' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. १० चे ६६ विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेत पाच विद्यार्थी यशस्वी ठरले.

प्रथम क्रमांक - मिताली धाबुगडे (१० अ)
द्वितीय क्रमांक - जाई मोहरे (१० अ)
तृतीय क्रमांक - आविष्कार मोरे (१० अ)
उत्तेजनार्थ क्रमांक - एकता भोसले (१० अ)
जागृती आसवले (१० अ)

➢ डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा २०१७-१८ या परीक्षेत इ. ९ वीच्या दोन विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिकासाठी निवड झाली.

➢ दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर २०१७ या कालावधीत क्रीडामहोत्सव झाला. यात लंगडी, खो-खो, डॉजबॉल, कबड्डी, वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या या स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

➢ १८ नोव्हेंबर राजी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, नौपाडा, ठाणे आयोजित चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेमध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील बक्षिसपात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

प्रथम क्रमांक - श्रेयस घारगे (८ अ)
द्वितीय क्रमांक - दिप्ती लांबे (८ अ)
तृतीय क्रमांक - ज्ञानेश्वरी सोनवणे (८ अ)
उत्तेजनार्थ क्रमांक - वैष्णवी सांगळे (८ अ)
साहिल मालुसरे (७ अ)

➢ आपल्या शाळेतील इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर सादर केलेल्या 'AN IRON DELICASY' या प्रकल्पाची निवड राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान परिषदेसाठी झाली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील परिषद २७ ते ३१ डिसेंबर या काळात अहमदाबाद येथे होणार आहे.

➢ शारदोत्सवानिमित्त दि. २४/११/२०१७ रोजी इ. ५वीची 'रांगोळी' स्पर्धा, इ. ६वी, ७वी साठी 'पौष्टिक भेळ' तसेच इ.९वी, १०वी साठी 'मेहंदी' स्पर्धा घेण्यात आली. सौ. धोत्रे, सौ. धनगर, श्री. दिघे यांनी परीक्षण केले. विद्यार्थ्यांकडून वरील स्पर्धांसाठी प्रचंड प्रतिसाद मिळाला. स्पर्धा अतिशय आनंदी व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

➢ कै. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दी निमित्त 'थोरामोठ्यांची ओळख' हा उपक्रम इ.१०वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमापासून झाली. यासाठी

शिवसमर्थच्या माजी उपमुख्याध्यापिका वर्षा ओक उपस्थित होत्या. त्यांनी गुरुशिष्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना गोष्टीरुपाने सांगितले.

कार्यक्रमाचे दुसरे पुष्प दोन सत्रात घेण्यात आले. यासाठी प्रसिद्ध समुपदेशक सौ. नेहा वैद्य उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना अतिशय छान समुपदेश केला.

कार्यक्रमाचे तिसरे पुष्प अतिरिक्त पोलीस आयुक्त (ACP) मान. श्री. प्रतापराप दिघावकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत मुलांना देशभक्तीचे धडे दिले. UPSC / MPSC ची तयारी कशी करावी हेही त्यांनी उत्कृष्टरित्या सांगितले.

कार्यक्रमाचे चौथे पुष्प ठाण्यातील पी. ई. सोसा.चे क्रीडा शिक्षक श्री. सतीश गोवर्धन जाधव हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना खेळ व आरोग्य या संदर्भात अतिशय सखोल माहिती देत जीवनात खेळाचे महत्त्व पटवून दिले. ह्या सर्व कार्यक्रमाचे नियोजन इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. तसेच कार्यक्रमाचा सर्व खर्च विद्यार्थ्यांनीच केला होता. हे कौतुकास्पद आहे.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

➢ **महाराष्ट्रभाषा आयोजित विविध स्पर्धांचे निकाल :**

| स्पर्धा | कक्षा | विजेतेचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| निबंध | ७ - ८ | श्रेया कोल्हटकर | ३रे |
| हस्ताक्षर | ७ - ८ | कृपा झंझारराव | ४ थे |
| चित्रवर्णन | ५ वी<br>५ वी | भूमिका चोरगे<br>निहारिका मोरे | ३ रे<br>४ थे |

➢ **लायनेस क्लब आयोजित पिस पोस्टर स्पर्धेत अनुष्का पाटील हिने दुसरे पारितोषिक पटकावले.**

➢ **PCRA आयोजित विविध स्पर्धांचा निकाल :**

| स्पर्धा | विजेतेचे नाव |
|---|---|
| मराठी निबंध | इशान फणसे<br>अदिती सूर्यवंशी |
| हिंदी निबंध | कुलश्री सूर्यवंशी<br>वैभवी चिविलकर |
| इंग्रजी निबंध | यतीश वैद्य<br>सोहम शिंपी |
| प्रश्न मंजुषा | यश कोकाणे<br>वरदराज कर्वे |
| चित्रकला | अनुष्का पाटील<br>सारा कुलकर्णी<br>शुभम करमपुरे<br>पर्णिका कुलकर्णी |

➢ **विद्या प्रसारक मंडळ आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेचा निकाल :**

| गट | विजेतेचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| छोटा | गायत्री बेडेकर<br>अमृता बापट<br>गौरांगी पाटील<br>साक्षी जोशी | १ले<br>२ रे<br>२ रे<br>उत्तेजनार्थ |
| मोठा | सिद्धार्थ वेर्णेकर | २ रे |

➢ **रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ आयोजित विविध स्पर्धा व परीक्षेचा निकाल :**

अ) आंतरशालेय नाट्य स्पर्धेचा निकाल : आमच्या विद्यार्थ्यांनी 'समाज रंगलाय सोशल मिडियात' हे नाटक सादर केले व पहिले पारितोषिक पटकावले.

आ) विविध स्पर्धेचे निकाल :

| स्पर्धा | विजेतेचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| चित्रकला | स्नेहा राठोड | १ ले |
| | मैत्रई मोभारकर | २ रे |
| | ऊर्जा बाळ | ३ रे |
| निबंध | दिव्या कद्रेकर | १ ले |
| | स्नेहा राठोड | २ रे |
| | अदित्य सामंत | ३ रे |

➢ **ऋचा देवळे हिने राष्ट्रीय स्तरावर रिदमिक जिमनॅस्टीक स्पर्धेमधे भाग घेऊन महाराष्ट्राच्या चमुतील खेळाडू म्हणून तिला सुवर्ण पदक मिळाले.**

➢ **बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ आयोजित गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत निहारिका मोरे आणि इशान फणसे यांनी ३ रा क्रमांक पटकावला.**

➢ **संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धांचे निकाल :-**

**१) निबंध स्पर्धा :**

५ वी /६ वी : द्वितीय - गार्गी कदम
उत्तेजनार्थ - अमृता बापट, गायत्री बेडेकर, गौतमी सहस्रबुद्धे, जय हलडनकर, शर्वरी मोहिते, अस्मी चांदे.

७ वी /८ वी : द्वितीय - सिया चौधरी
उत्तेजनार्थ - ऊर्जा बाळ, प्रचीती जोग, कुश दास्ताने, जान्हवी बेडेकर, इशान फणसे, श्रीया कोल्हटकर, अनुश्री खेडेकर, श्रावणी मुर्कुटे, आयुषी वाणी, अहाना जोशी, सुरश्री वालंमे, मोहा कुलकर्णी, रिचा ठाणेकर.

९ वी/१० वी : प्रथम - साशा गोरे
उत्तेजनार्थ - प्रीती खामकर, साहिल अंजरलेकर, धनश्री पवार, कृष्णा पदादुणे, निलांबरी सर्वदे, केतकी धर्माधिकारी, रिषभ गाडा, नेहाली पालकर.

**२) चित्रकला स्पर्धा :**

५ वी/६ वी : प्रथम - सेजल सोनावणे
उत्तेजनार्थ - गार्गी कदम, अस्मी चांदे, अस्मी वारीक, गौरी जाधव, मिहिका पटवर्धन, शर्वरी मोहिते, स्वरा जोशी, मुग्धा जोशी, श्रेया कदम, रिया जोगळेकर, मल्हार देसाई, यशश्री दाभोळकर, अस्मी गोरे, मोहक जोशी, द्विज डोंगा.

७ वी /८ वी : द्वितीय - साईश गीध
उत्तेजनार्थ - सिया चौधरी, प्रेकक्षा आर्यमाने, रिचा ठाणेकर, जान्हवी पाटील, मनस्वी टोपले.

९ वी /१० वी : प्रथम - पर्णिका कुलकर्णी
उत्तेजनार्थ - तिशा बौआ, कृष्णा पदादुणे.

**३) भेटकार्ड स्पर्धा :**

५ वी / ६ वी : द्वितीय - शार्वी कदम
उत्तेजनार्थ - संस्कृती पिसाट, विदुला चव्हाण, शार्दुल अढव, गार्गी लिमये, भूमिका चौरगे, श्रावणी नाखवा, अरिमी गोरे, गार्गी कदम, निशी बौवा, मुग्धा जोशी, निलभ शेजवलकर, शार्वरी मोहिते, अस्मी चांदे.

७ वी / ८ वी : द्वितीय - साईश गीध
उत्तेजनार्थ - सिया चौधरी, दिशा परख, पार्थ विसारिया, अदिती चव्हाण.

९ वी / १० वी : प्रथम - तन्मया संत
उत्तेजनार्थ - कृष्णा पदादुणे, शर्वरी चव्हाण, तिशा बौवा.

**४) गायन स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम - गौतमी सहस्रबुद्धे

७ वी / ८ वी : प्रथम - मैथिली बापट

समाज हा हवेसारखा असतो, श्वासोच्छ्वासासाठी त्याची गरज भासते;
पण जगण्यास मात्र तो अपुरा वाटतो. - जी. संतायना

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

➢ विधी द्वितीय, चौथ्या व सहाव्या सत्राच्या माजी विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ रोजी घेण्यात आली. सदर परीक्षा ही विद्यापीठाच्या नोव्हेंबर, डिसेंबर २०१७ मध्ये होणाऱ्या परीक्षेला बसण्याची पूर्व अट असते.

➢ **दिवाळीच्या सुट्ट्या :** विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे दिनांक १६ ते २८ ऑक्टोबर २०१७ या कालावधीमध्ये दिवाळीच्या सुट्ट्या देण्यात आल्या होत्या.

➢ **प्रथम विधी प्रवेश प्रक्रिया :** प्रथम विधी प्रवेशाच्या प्रथम फेरी दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सुरू झाली. एकूण २४० जागेपैकी पहिल्या फेरीमध्ये २२८ जागा देण्यात आल्या होत्या. पहिल्या फेरीमध्ये एकूण १४५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. दुसरी फेरी दिनांक २५ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या दरम्यान घेण्यात आली. यामध्ये ३८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. अशाप्रकारे एकूण प्रवेश १८३ एवढे झाले आहेत.

➢ **प्रथम विधी शिकवणी वर्ग :** दिनांक १ नोव्हेंबर २०१७ पासून प्रथम विधीचे 'अ' व 'ब' वर्गाची शिकवणी वर्ग सुरू करण्याचे ठरवले आहे.

➢ **ठाणे मध्यवर्ती कारागृह भेट :** महाराष्ट्र कारागृह सुधार समितीच्या सुचनेप्रमाणे विधी महाविद्यालयाचे एकूण ४० विद्यार्थी १२ चमूमध्ये, प्राध्यापक विनोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३, ६, १० आणि १३ ऑक्टोबर रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृहास भेट देऊन तेथील एकूण ४६ कैद्यांना भेटून त्यांची केस ऐकून त्यांच्यासाठी जामिनाचा अर्ज तयार करून दिला. सदर अर्ज कारागृह अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. महाविद्यालयाने तयार केलेला अहवालाचे कारागृहास सुधार समितीचे सदस्य प्रा. राघवन यांनी विशेष कौतुक केले.

➢ **विधी प्रवेश प्रक्रिया संपन्न :** CET च्या माध्यमातून होणारी प्रथम विधीची प्रवेश प्रक्रिया महाविद्यालयाने यशस्वीरित्या पूर्ण केली. महाविद्यालयाने २४० जागेवरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली असून वर्ग क व ड ची शिकवणी सुरू करण्यात आली आहे.

➢ **संविधान दिवस साजरा :** दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ महाविद्यालयामध्ये संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ''सामान्य माणसाच्या नजरेतील संविधान'' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी द्वितीय, तृतीय विधीचे पलक गुप्ता व स्वानंद गांगल यांनी विषयावर भाषण केले. तसेच प्रथम विधीच्या अनेक विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला.

➢ **परीक्षा संपन्न :** द्वितीय, चौथ्या व सहाव्या सत्राच्या परीक्षा नोव्हेंबर महिन्यात घेण्यात आल्या. सर्व परीक्षा व्यवस्थितरित्या पार पडल्या.

➢ **मोफत कायदेशीर सहाय्यता अभियान :** ठाणे विधी सेवा प्राधिकरण व महाविद्यालयाचे मोफत विधी सहाय्य केंद्र यांच्या मार्फत कायदेशीर जनजागृती अभियानाचा भाग म्हणून दिनांक १० नोव्हेंबर २०१७ रोजी मोटार सायकल रॅली व दिनांक ११ नोव्हेंबर २०१७ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.



•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

हजारोंच्या संख्येने लोकांनी रांगा लावून ते चित्र बघितले. इ.स.१५०० नंतर काही डझनांनी त्याच्या प्रतिकृती कलाकारांनी बनवल्या आणि त्या आज जगातल्या संग्रहालयांमध्ये बघायला मिळतात. पण हे मूळ चित्र मात्र बरेच वर्ष गायब होते. लिओनार्दोने हे चित्र तत्कालीन फ्रेंच राजाच्या विनंतीवरून काढले होते. इ.स.१६२५ मध्ये Henrietta Maria या फ्रेंच युवतीचे इंग्लंडच्या Charles I बरोबर लग्न झाले आणि तिच्याबरोबर हे चित्र इंग्लंडच्या राजघराण्यांत आले. १६४९ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटने राजघराण्यातील कलाकृती आणि वस्तूंची एक यादी प्रकाशित केली; त्यामध्ये या कलाकृतींचा उल्लेख आढळतो. राजाला झालेल्या कर्जाची फेड करण्याकरिता इ.स. १६५१ मध्ये John Stone या स्थापत्यकाराकडे ते हस्तांतरीत झाले. इ.स.१६६० ला Charles II गादीवर आला आणि हे चित्र त्या स्थापत्यकाराकडून पुन्हा राजघराण्याकडे आले. सुमारे इ.स.१८०० पर्यंत ते राजघराण्यातच असावे असा अभ्यासकांचा अंदाज आहे. इ.स.१९०० मध्ये आणखीन एक कला-संग्राहक Cook याच्याकडे ते लिओनार्दोच्या सहकाऱ्याची कलाकृती म्हणून आले. इ.स.१९५८ साली Cook यांच्या संग्रहाचा लिलाव झाला आणि फक्त ४५ पौंडाला ते विकले गेले. अजूनपर्यंतच्या या चित्राच्या प्रवासामुळे त्याची बरीच दुर्दशा झाली होती. डागडुजीच्या नावाखाली त्यावर काही रंगांची पुटंही चढविण्यात आली होती. पुन्हा ५० वर्ष ते चित्र गायब झाले. इ.स. २००५ साली अमेरिकेमधल्या एका लिलावामध्ये नगण्य किंमतीला ते पुन्हा विकले गेले. तेथूनच या चित्राच्या पुनरुद्धाराला सुरुवात झाली.

सर्व आधुनिक तंत्रज्ञान वापरून ते चित्र पहिल्यासारखे करण्याचा प्रयत्न या नवीन मालकाने चालू केला. न्यू यॉर्क विद्यापीठाच्या कलाविभागाचे प्रमुख Dianne Dwyer Modestini यांनी आपले सर्वस्व पणाला लावून या चित्राच्या साफसफाई, जतन आणि त्याला मूळ स्वरूपाकडे आणण्याचा प्रयत्न चालू केला. लिओनार्दोच्या इतर चित्रांचा अभ्यास आणि तज्ज्ञांशी सल्ला मसलत करून हे चित्र लिओनॉर्दोचेच आहे हे त्यांनी प्रस्थापित केले. अमेरिकेतील जगप्रसिद्ध मेट्रोपॉलिटीयन म्युझियमच्या कला अभ्यासकांनीही हे आव्हान स्वीकारून त्याचा कसून अभ्यास केला. 'The Virgin of the Rocks' हे लिओनॉर्दोचे समकालीन चित्र लंडनच्या प्रसिद्ध नॅशनल गॅलरीमध्ये आहे. जगातले सगळे कला-अभ्यासक पुन्हा एकदा या चित्राच्या तुलनात्मक अभ्यासाला लागले, आणि त्या सगळ्यांनी हे चित्र लिओनॉर्दोचेच आहे हे तर सिद्ध केलेच, आणि





**फ्लोरेन्स इटाली येथील लिओनार्दो दा विंची यांचा पुतळा**

नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ते त्याच्या मूळ स्थितीवर आणून ठेवले. ही एक अत्यंत नाजूक, गुंतागुंतीची आणि खर्चिक पद्धत आहे.

इ.स. २०११ मध्ये लंडनच्या नॅशनल गॅलरीमध्ये लिओनॉर्दोच्या उपलब्ध कलाकृतींचे प्रदर्शन भरले होते. त्यामध्ये या चित्राचाही समावेश करण्यात आला. मध्यंतरीच्या काळामध्ये हे चित्र आपण वर उल्लेख केलेल्या रशियन अब्जाधीशांनी १२७ मिलियन डॉलरना विकत घेतले होते आणि शेवटी 'ख्रिस्ति'नी ते लिलावात सौदीच्या राजघराण्याला ४०० मिलीयन डॉलरला विकले. गेली काही दशकं चीननेही अशा कलाकृती विकत घेण्याचा सपाटा लावला आहे. शांघाय, बेजिंग येथे भव्य कला-दालनं आणि ग्रंथालयं याकरताच उभारली जात आहेत. आबूधाबी आणि इतर अरब शहरांमधूनही भव्य कला-संग्रहालयं उभी रहात आहेत. अभिरुची आणि कला आस्वादाच्या राजधान्या आता नक्कीच बदलत आहेत. आपली शहरं मात्र भ्रष्ट राजकारण्यांच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लावून विद्रूप केली जात आहेत.

एका राजघराण्यातून दुसऱ्या राजघराण्यातील या चित्राचा हा प्रवास बरीच 'सांस्कृतिक' स्थित्यंतरं दाखविणारा आहे.

लिओनॉर्दो हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. अनेक अभ्यासक त्याला 'प्रबोधन पुरुष' म्हणून संबोधतात, आणि ते योग्यही वाटते. युरोपमधील विज्ञानक्रांती, औद्योगिक क्रांती आणि त्याबरोबरच सामाजिक आणि कलाक्षेत्रामधील बदल हे १५ व्या शतकात म्हणजे 'प्रबोधन' युगामध्येच चालू झाले. लिओनॉर्दो हा आपल्या वडिलांचा अनौरस पुत्र. त्याच्या वडिलांनी ४ लग्ने केली होती आणि लिओनॉर्दोला १२ भावंडे होती. लिओनॉर्दोचे बरेचसे आयुष्य फ्लॉरेन्स या गावी गेले. फ्लॉरेन्स प्रमाणेच मिलान, वॅटिकन आणि फ्रान्समध्येही त्याचे वास्तव्य झाले. लिओनॉर्दो चित्रकार म्हणून जरी प्रसिद्ध असला तरी गणित, अभियांत्रिकी, स्थापत्य, शरीररचनाशास्त्र, वनस्पतिशास्त्र या सगळ्या विषयांमध्ये त्याची गती चांगलीच होती. 'विमान', 'रणगाडा' अशा अनेक कल्पना त्याने त्यावेळेला रेखाटून ठेवल्या आहेत! त्या प्रत्यक्षात यायला पुढे ३००-४०० वर्षे जायला लागली.



**व्हिट्रुवियन मॅन (Vitruvian Man)**

लिओनॉर्दोची सुमारे २० चित्रे आज अभ्यासकांना उपलब्ध आहेत. 'मोनालिसा' आणि 'द लास्ट सपर' ही त्याची प्रचंड गाजलेली चित्रे. त्याचप्रमाणे शरीराच्या वेगवेगळ्या भागांचे तौलनिक मोजमाप देणारे 'व्हिट्रुवियन मॅन' (Vitruvian Man) हे रेखाचित्रही त्याचेच आहे.



**द लास्ट सपर (The Last Super)**


लिओनॉर्दोच्या चित्रांप्रमाणेच त्याची टिपणं आणि रेखाचित्रांची संख्या सुमारे १३,००० आहे. याचे विषयही अनेक आहेत. त्याच्या मृत्यूनंतर दुर्दैवाने त्याच्या नातेवाईक हितचिंतकांमध्ये ते वाटले गेले. अभ्यासकांनी प्रचंड मेहनत घेऊन ती शोधून काढली आणि युरोपमधल्या वेगवेगळ्या ग्रंथालयं आणि संग्रहालयांमध्ये ती आज उपलब्ध आहेत. Codex Leicester हे विज्ञानाशी निगडित असलेले एक बाड, मायक्रोसॉफ्टचे मालक Bill Gates त्यांच्या संग्रहामध्ये सध्या आहे.

रॅफेल (Raphael) आणि मायकेलऐंजेलो (Michelangelo) हे दोन मोठे चित्रकारही लिओनॉर्दोचेच समकालीन.



**मोनालिसा** (**Monalisa**)

विज्ञान काय किंवा कला काय, दोघांच्याही अभ्यासाला किंवा संशोधनाला सृजनशील मन लागते. लिओनॉर्दो हे त्याचे सर्वात चांगले उदाहरण आहे. लिओनॉर्दोची चित्रं आणि इतर लेखन यावर आज अनेक संशोधनपर ग्रंथ उपलब्ध आहेत. Giorgio Vasari यांनी १५६८ साली तत्कालीन कलाकारांची माहिती देणारे Lives of the Artists हे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकामध्ये लिओनॉर्दोवरतीही एक लेख आहे आणि आजही त्याचा संदर्भ घेऊनच लिओनॉर्दोवरती पुढील संशोधन करावे लागते.



**लिओनार्दोच्या टीपण वहीतील एक पान**

लिओनॉर्दोच्या चित्रांना मिळणारी किंमत ही फक्त त्याच्या आर्थिक मुल्यापुरती सीमित नाही. त्याचे सर्व

लिखाण किंवा चित्रे ही तत्कालीन युरोपमधील प्रबोधन युगामध्ये होणाऱ्या ‘सामाजिक’ आणि ‘सांस्कृतिक’ बदलाचे प्रतिबिंब आहेत. त्यांचा अभ्यास हा ग्रंथालयं किंवा कला-इतिहासकारांकडून तर होतोच, पण विद्यापीठीय अभ्यास आणि संशोधनाचाही तो एक मोठा भाग आहे. कला आणि विज्ञान या दोन्हीही शाखा एकमेकांमध्ये किती गुंतलेल्या आहेत याचे लिओनॉर्दो हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. गॅलिलिओ, न्यूटन आणि विज्ञानाच्या तत्कालीन अनेक संशोधकांना लिओनॉर्दो, मायकेलएँजेलो इ. कडून स्फूर्ती मिळाली होती. युरोपमधील ‘प्रबोधन’ युगाचे हेच मोठे वैशिष्ट्य आहे की, त्यांच्या ‘विज्ञान’ आणि ‘कलांचा’ विकास हा परस्परावलंबी होता. नवनिर्मिती करता लागणारी सर्जनशीलता दोघांनाही सारखीच लागते. आपल्याकडचे त्याचे चांगले उदाहरण म्हणजे होमी भाभा यांचे आहे. ते जसे चांगले वैज्ञानिक होते तेवढेच चांगले चित्रकारही होते.

रोमन साम्राज्याचा अस्त म्हणजे ५ व्या शतकापासून, प्रबोधन युगाची सुरुवात म्हणजे १५ व्या शतकापर्यंतचा काळ हा युरोपच्या इतिहासामध्ये ‘मध्ययुगीन’ काळ धरला जातो. या काळामध्ये तेथे फारशी प्रगती होत नव्हती. १५ व्या शतकात चालू झालेले ‘प्रबोधन’ युग हे म्हणूनच महत्त्वाचे आहे. युरोपमधील अभ्यासक याचवेळी आपल्या ग्रीक आणि रोमन तत्त्वज्ञान आणि कलाकृतींकडे बघायला लागले, त्यातून स्फूर्ती घ्यायला लागले. ग्रीक आणि लॅटीन भाषांचा सखोल अभ्यास आणि त्यांच्या मूळ ग्रंथांच्या शोधाला प्राधान्याने सुरुवात झाली. युरोपमध्ये याआधी ही माहिती ग्रीक आणि लॅटीन ग्रंथांच्या अरेबिक भाषांतरातून मिळत होती. यातूनच त्यांच्या ‘मानवी पुनरुत्थानवादला’ (Renaissance Humanism) सुरुवात झाली.

आपल्या संस्कृतीमध्येही ‘प्राचीन’ आणि ‘अर्वाचीन’ काळामध्ये असे अनेक ‘प्रबोधन पुरुष’ विज्ञान आणि कलाक्षेत्रांत होऊन गेले. २० व्या शतकामधल्या अनेक ‘पाश्चिमात्य’ वैज्ञानिक आणि कलाकारांनी त्यांच्या लिखाणातून स्फूर्ती घेतली. त्यांची हस्तलिखितं आणि कलाकृती तेथील ग्रंथालयं आणि संग्रहालयांमध्ये सुस्थितीत सांभाळली. आपल्याकडे मात्र यांचे प्रचंड पुतळे उभारण्यामध्येच हजारो, करोडो रुपयांचा अपव्यय चालू आहे. आपल्या सण आणि उत्सवांमध्ये आलेली विकृती आणि त्याचे राजकियीकरण हे त्या अधोगतीचे पुढचे पाऊल आहे. विज्ञान, कला, संगीत किंवा नृत्यांचे अनुकरण कितीही चांगले असले तरी ती नक्कलच असते. उसनवारीचा व्यवहार फार काळ टिकू शकत नाही. नाविन्याला तर तो मारक असतोच, पण गुलामगिरी किंवा नव-वसाहतवादाला ते निमंत्रणच असते. लिओनॉर्दो किंवा तत्कालीन कलाकारांची ‘खरी’ किंमत जेव्हा आपल्याला कळेल तेव्हाच भारतामध्ये पुन्हा प्रबोधन युगाची सुरुवात होईल आणि प्राचीन संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयाच्या संशोधन आणि चिकित्सक अभ्यासाला सुरुवात होईल.

तोपर्यंत पुतळ्यांच्या खाली सावलीत बसून राहण्यापलीकडे आपल्याकडे काहीच पर्याय नाही!

**- डॉ. विजय बेडेकर**

●●●

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.